# राम प्रहर

रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १७ ◆ अंक १८०

www.ramprahar.com

बुधवार, १५ जानेवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


## अंतरंग


राष्ट्रीय स्टार्टअप दिवसाचे उद्या होणार उद्घाटन/२

नवी मुंबई विमानतळाला ‘दिबां’चेच नाव लागणार/६

आजपासून राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचा थरार/८


## ‘पीओकेत दहशतवादी कॅम्प; पाकला परिणाम भोगावे लागतील’



**अखनूर (जम्मू-काश्मिर) :** भारताचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी पीओके आणि पाकिस्तानबाबत मोठे वक्तव्य केले आहे. नवव्या सशस्त्र सेना दिनाच्या कार्यक्रमात बोलताना ते म्हणाले की, जम्मू-काश्मीर पीओकेशिवाय अपूर्ण आहे. पीओके पाकिस्तानचा नाही, तर भारताचा भूभाग आहे. पीओकेच्या जमिनीचा वापर दहशतवाद पसरवण्यासाठी केला जातोय. पीओकेमध्ये दहशतवादी प्रशिक्षण शिबिरे सुरू आहेत. सीमेजवळील भागात लाँच पॅड बनवण्यात आले आहेत. भारत सरकारला याची संपूर्ण माहिती आहे. पाकिस्तानने पीओकेत दहशतवादी कारवाया थांबवाव्या; अन्यथा परिणामांना सामोरे जाण्यासाठी तयार राहावे लागेल, असा इशाराही त्यांनी या वेळी दिला. अनेक मुस्लिम बांधवांनी देशाच्या सार्वभौमत्व रक्षणासाठी दहशतवादाशी लढताना आपल्या प्राणांची आहुती दिली, असेही संरक्षणमंत्री म्हणाले.

# पंतप्रधान मोदींच्या हस्ते आज युद्धनौकांचे लोकार्पण आणि इस्कॉन मंदिराचे उद्घाटन

**मुंबई : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी बुधवारी (दि. १५) महाराष्ट्र दौऱ्यावर येत आहेत. सकाळी सुमारे १०.३० वाजता पंतप्रधान मुंबईच्या नौदल गोदीत आयएनएस सुरत, आयएनएस निलगिरी व आयएनएस वाघशीर या नौदल युद्धनौकांचे राष्ट्रार्पण करतील. त्यानंतर दुपारी सुमारे ३.३० वाजता ते खारघर येथील इस्कॉन मंदिराचे उद्घाटन करणार आहेत.

या वेळी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार आदी मान्यवरांसह नौदलाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत.



दरम्यान, मुंबईतील नौदलाच्या आंग्रे सभागृहात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महायुतीच्या आमदारांची बैठक होणार आहे. पंतप्रधान मोदी या वेळी आमदारांशी संवाद साधतील. विधानसभा निवडणुकीमध्ये विक्रमी विजयानंतर पंतप्रधान मोदी कार्यक्रमासाठी पहिल्यांदाच महाराष्ट्रात येत आहेत. राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पाहता पंतप्रधानांचा हा दौरा महत्त्वाचा आहे.

भारताच्या सांस्कृतिक वारशाला चालना देण्याच्या वचनबद्धतेनुसार श्री श्री राधा मदनमोहन मंदिर खारघर येथील इस्कॉन प्रकल्पाचेही उद्घाटन पंतप्रधान मोदी करतील. नऊ एकरांवर वसलेल्या या प्रकल्पात अनेक देव-देवतांची मंदिरे, वैदिक शिक्षणाचे केंद्र, प्रस्तावित वस्तुसंग्रहालय, सभागृह व उपचार केंद्र यांचा समावेश आहे. विश्वबंधूत्व, शांतता, सौहार्द वाढवणे हे वैदिक शिक्षण केंद्राचे उद्दिष्ट आहे.

## लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांनी खारघरमध्ये घेतला आढावा



**पनवेल :** खारघर येथील इस्कॉन मंदिराचा उद्घाटन सोहळा देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी (दि. १५) मोठ्या उत्साहात होणार आहे. या पार्श्वभूमीवर आमदार प्रशांत ठाकूर यांनी खारघर येथील इस्कॉन मंदिराला सोमवारी भेट देत श्रींचे दर्शन घेतले आणि तेथील व्यवस्थापकीय मंडळासोबत चर्चा करून तयारीचा आढावा घेतला. दरम्यान, या मंदिराला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनीही मंगळवारी भेट देत दर्शन घेतले व पाहणी केली. या वेळी भाजपचे जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल, खारघर शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक नरेश ठाकूर, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, अक्षय सिंग आदी उपस्थित होते.



## वाल्मिक कराडवर ‘मकोका’

■ १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

**केज : प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील केज न्यायालयाने खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडबाबत मोठा निर्णय दिला आहे. कराडवर मकोका कायद्यांतर्गत कारवाई केली जाणार आहे. त्याचबरोबर त्याची १४ दिवसांसाठी न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे.



खंडणी प्रकरणाबाबत वाल्मिक कराड याला मंगळवारी (दि. १४) बीडच्या केज न्यायालयात हजर करण्यात आले होते. न्यायालयात सरकारी वकिलांनी वाल्मिकची सीआयडी कोठडी मागितली, मात्र न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी दिली.

मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात वाल्मिक कराड प्रमुख आरोपी असल्याचा दावा विरोधी पक्षांमधील नेते व ग्रामस्थांनी केला आहे तसेच देशमुख यांच्या कुटुंबानेदेखील कराडवर आरोप केले आहेत. या हत्या प्रकरणात आतापर्यंत इतर आठ आरोपींना अटक करण्यात आली असून सर्वांवर मकोका लावण्यात आला आहे. त्यामुळे कराडवरदेखील मकोका कायद्यांतर्गत कारवाई केली जावी, अशी मागणी होत होती. ही मागणी अखेर पूर्ण झाली आहे.

# पानिपत मराठ्यांच्या शौर्याची गाथा!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे गौरवोद्गार; वीरभूमीला वंदन

**पानिपत (हरियाणा) : वृत्तसंस्था**

१४ जानेवारी १७६१ हा दिवस मराठे, महाराष्ट्र आणि आपल्या देशाचा इतिहास कधीही विसरणार नाही. पानिपतचे युद्ध आपल्या देशाच्या आणि मराठेशाहीच्या इतिहासातली भळभळती जखम आहे. त्याचवेळी ती मराठ्यांच्या शौर्याचीही गाथा आहे, कारण ज्या विपरीत परिस्थितीत मराठे लढले त्याला तोड नाही. याच पानिपतच्या वीरभूमीला वंदन करण्यासाठी मी आलो आहे, असे उद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.




पानिपत हा मराठी माणसाचा अभिमानही आहे. ज्या प्रकारे मराठ्यांनी पानिपतच्या युद्धात शौर्य दाखवले ती युद्धाच्या इतिहासातील एक अत्यंत मोठी गोष्ट आहे. या शौर्यानंतर आणि इतक्या मोठ्या प्रमाणावर सैनिक या युद्धात वीरगतीला गेल्यानंतरही मराठ्यांनी कधीही हार मानली नाही. त्यानंतर दहा वर्षांत पुन्हा एकदा संपूर्ण भारतावर भगवे राज्य प्रस्थापित केले आणि दिल्लीही जिंकून दाखवली. त्यामुळे मराठ्यांची वीरता आणि शौर्य अतुलनीय आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

छत्रपती शिवरायांनी जे हिंदवी स्वराज्य स्थापन केले त्या स्वराज्याला त्यांच्यानंतर त्यांच्या आशीर्वादाने संपूर्ण भारतात पसरवण्याचे काम मराठ्यांनी केले. पानिपत ही अशी लढाई आहे की, ज्यात तांत्रिकदृष्ट्या पराभव झाला तरीही मराठे कधीही हरले नाही. त्यांनी आपले शौर्य सातत्याने इतके वाढवले की भारतावर कधीही आक्रमण करण्याची हिंमत कुणी केली नाही. या मंगलभूमीला वंदन करण्याची संधी मिळाली हे मी माझे भाग्य समजतो, असे सांगून शौर्य स्मारकासाठी सहकार्य करू, असे मुख्यमंत्री म्हणाले.

### एकत्रित आहोत तरच सुरक्षित आहोत!

*छत्रपती शिवरायांनी ज्या हिंदवी स्वराज्याची स्थापना केली त्या स्वराज्यात अठरा पगड जातीचे लोक मावळे म्हणून लढले. स्वराज्य विस्तारीत करण्याचे काम त्यांनी केले. छत्रपतींनी सामान्य माणसांमध्ये पौरुष जागृत करून त्यांना असामान्य बनवले. मला असे वाटते जोपर्यंत हे आम्हाला लक्षात राहिल की, आम्ही एकत्रित आहोत तरच सुरक्षित आहोत, प्रगती आहे. आम्ही जातीपातीच्या गोष्टींमध्ये विभाजित झालो तर आपल्याला प्रगती करता येणार नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी भगव्या झेंड्याखाली आम्हाला एकत्र आणले तशाच प्रकारे भगव्या झेंड्याखाली आणि भारताच्या तिरंगा झेंड्याखाली आम्हाला एकत्र येणे ही काळाची गरज आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.*

## निवडक

### एलओसीजवळ सुरुंग स्फोट, लष्कराचे सहा जवान जखमी

**राजौरी :** जम्मू काश्मीच्या राजौरी जिल्ह्यातील नौशेरा येथे नियंत्रण रेषेजवळ भारतीय लष्कराचे जवान गस्त घालत असताना मंगळवारी (दि. १४) सकाळी १०.४५च्या सुमारास सुरुंगाचा स्फोट झाला. या स्फोटात भारतीय लष्कराचे सहा जवान जखणी झाले आहेत. जखमी जवानांवर रुग्णालयात उपचार सुरू असून सर्वांची प्रकृती स्थिर आहे.

### सीआयएसएफच्या दोन नवीन बटालियनना केंद्राची मान्यता

**नवी दिल्ली :** केंद्रीय गृह मंत्रालयाने केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलासाठी (सीआयएसएफ) दोन हजारहून अधिक कर्मचाऱ्यांच्या दोन नवीन बटालियनना मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे सीआयएसएफच्या क्षमतेसह राष्ट्रीय सुरक्षादेखील अधिक मजबूत होणार आहे. सीआयएसएफमध्ये सध्या १२ राखीव बटालियन असून प्रत्येक बटालियनमध्ये १,०२५ कर्मचारी आहेत. आता यात आणखी भर पडणार आहे.

## खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या कंपन्यांना एकाच नियमावली अंतर्गत आणणार -परिवहनमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

ओला, उबेर व रॅपिडोसारख्या खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या सर्व कंपन्यांना एकाच नियमावलीअंतर्गत आणणार असल्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले. प्रवासी सुरक्षा, कार पुलिंग, लायसन्स, ट्रॅफिक समस्या या संदर्भातील पारदर्शक तक्रार यंत्रणा तातडीने तयार करण्याचे निर्देशही सरनाईक यांनी दिले.



राज्यातील खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या कंपन्यांना एकाच शासकीय नियमावली अंतर्गत आणण्यासंदर्भात मंगळवारी (दि. १४) मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले. या वेळी परिवहनचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांच्यासह प्रवासी वाहतूक पुरवठादार कंपनीचे प्रतिनिधी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

परिवहनमंत्री सरनाईक म्हणाले की, खासगी प्रवासी वाहतूक कंपन्यांसंदर्भात केंद्र सरकारने आणलेल्या धोरणाचा अभ्यास करून या कंपन्यांना एकाच परिवहन नियमांतर्गत एकत्रित आणणे गरजेचे आहे. प्रवासी सुरक्षेला प्राधान्य देण्यात यावे. सर्व प्रवासी वाहतूक पुरवठादार कंपन्यांतर्गत चारचाकी, बाईक, टॅक्सी यांचा समावेश करण्यात येणार आहे. बाईक चालविण्यासाठी महिला चालकांनाही प्राधान्य देण्यात यावे, जास्तीत जास्त रोजगार कसा निर्माण करता येईल यासाठी प्राधान्य द्यावे तसेच त्यांच्या सुरक्षेसंदर्भात कंपन्यांनी उपाययोजना कराव्यात, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

खासगी वाहतूक व्यवस्था, सुस्थितीत असलेली वाहने, प्रवाशांची सुरक्षा, हेल्मेट, महिला चालकांची सुरक्षा, तत्पर सेवा इत्यादी बाबींचा वाहतूक धोरणात समावेश करण्यासंदर्भातील सादरीकरण यावेळी परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांनी केले.

### एसटी कर्मचाऱ्यांसाठी रुग्णालय उभारणार

राज्यातील अनेक बसस्थानके बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा या तत्वावर विकसित करण्यात येत आहेत. एसटी कर्मचाऱ्यांसाठी या प्रकल्पात प्रत्येक जिल्ह्यात २५, तर मुंबईतील बोरीवली येथील जागेवर १०० खाटांचे रुग्णालय सुरू करण्यात येणार आहे. या रुग्णालयात एसटी कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांसाठी महात्मा फुले जनआरोग्य योजनेतून उपचार करण्यात येतील तसेच पाच लाखांपर्यंतच्या शस्त्रक्रियांचा खर्च राज्य शासन करेल, असेही परिवहनमंत्री सरनाईक यांनी सांगितले. भविष्यात या रुग्णालयांमध्ये एसटी कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांना कॅशलेस वैद्यकीय सुविधा पुरवण्यात येतील.

## राज्यात आरटीई २५ टक्के जागांच्या नोंदणीला सुरुवात

**अलिबाग : प्रतिनिधी**

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांसाठी विद्यार्थी नोंदणी प्रक्रियेला मंगळवार (दि. १४)पासून सुरुवात झाली आहे. राज्यभरातील एक लाख आठ हजारांपेक्षा अधिक जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. त्यामध्ये रायगड जिल्ह्यातील २६६ शाळांचा समावेश असून चार हजार ५७८ जागा उपलब्ध आहेत.

१४ ते २७ जानेवारी या कालावधीत जास्तीत जास्त पालकांनी ऑनलाइन अर्ज भरावेत, असे आवाहन रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक) पुनीता गुरव यांनी केले आहे. विशेष म्हणजे खोटी, चुकीची माहिती भरून प्रवेश निश्चित केला आणि ही बाब प्रशासनाच्या निदर्शनास आल्यास दिशाभूल केल्याप्रकरणी आरटीई २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येणार आहे. त्यामुळे पालकांनी या बाबींचा विचार करुनच अर्ज भरणे गरजेचे आहे.

### रायगडातील २६६ शाळांमध्ये ४,५७८ जागा उपलब्ध




राज्यभरातील आठ हजार ८४९ शाळांनी आरटीई प्रवेश प्रक्रियेत सहभाग नोंदवला आहे. या शाळांमध्ये प्रवेशासाठी एकूण एक लाख आठ हजार ९६१ जागा उपलब्ध झाल्या आहेत. रायगड जिल्ह्यातील २६६ शाळांचा समावेश असून चार हजार ५७८ जागा उपलब्ध आहेत. पालकांना https://student.maharashtra.gov.in/admšportal या लिंकवर विद्यार्थ्यांचे अर्ज भरता येतील.

## पतंग महोत्सवातून मकरसंक्रांतीचा आनंद द्विगुणित






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मकरसंक्रांत सणानिमित्ताने पनवेलमधील सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने नमो उत्सव अंतर्गत सोसायटीच्या मैदानावर आयोजिलेल्या पतंग महोत्सवाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या वेळी लहान मुले, युवक आणि महिलांनीही पतंग उडवण्याचा आनंद घेतला.

या महोत्सवाला प्रमुख मान्यवर म्हणून शकुंतला ठाकूर, पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, भाजपचे जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, उपाध्यक्ष जयंत पगडे, उद्योजक राजू गुप्ते, भाजप शहराध्यक्ष अनिल भगत, माजी उपमहापौर चारुशीला घरत, जिल्हा चिटणीस अमरीश मोकल, शहर चिटणीस अमित ओझे, टीआयपीएलचे संचालक अमोघ ठाकूर, भाजप शहर उपाध्यक्ष केदार भगत, माजी नगरसेवक अजय बहिरा, महिला मोर्चाच्या शहराध्यक्ष राजेश्री वावेकर, माजी नगरसेविका वृषाली वाघमारे, प्रीतम म्हात्रे, प्रशांत पोतदार, प्रशांत झुंजारराव, स्वप्नील ठाकूर यांची उपस्थिती लाभली.

लहान मुला-मुलींसाठी विशेष पतंग उपलब्ध करून देण्यात आले होते. आकाशात भरारी घेणाऱ्या पतंगाची जणू स्पर्धाच सुरू होती. सेल्फी पॉइंट, लाईव्ह म्युझिकचाही आनंद उपस्थितांनी घेतला. सायंकाळी आकाशदिवे गगनात सोडून या महोत्सवाचा आनंद आणखी वाढल्याचे पहावयास मिळाले. (पान २ वर..)

## माथेरानमध्ये वाहतुकीसाठी आणखी ई-रिक्षा मिळणार

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान श्रमिक हातरिक्षा चालक मालक संघटनेचे मंगळवार (दि.१४)पासून सुरू होणारे बेमुदत उपोषण तूर्तास स्थगित करण्यात आले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी उर्वरित हातरिक्षाचालकांना ई-रिक्षा देण्याबाबत कार्यवाही सुरू केल्याने नियोजित उपोषण मागे घेतले असल्याचे हातरिक्षा संघटनेकडून सांगण्यात आते. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयात बुधवारी (दि. १५) ई-रिक्षा व क्ले-पेव्हर ब्लॉक या संदर्भात सुनावणी आहे. त्यामुळे त्या निर्णयाकडेही ई-रिक्षाचालकांचे लक्ष लागून आहे.

सध्या माथेरानमध्ये २० ई-रिक्षा सुरू आहेत. पायलट प्रकल्प यशस्वी झाला तरी उर्वरित ७४ हातरिक्षा चालकांना ई-रिक्षा देण्यास विलंब होत असल्याने हातरिक्षा व ई-रिक्षा मंगळवारपासून बेमुदत बंद ठेवण्याचे जाहीर करण्यात आले होते. बंदची घोषणा केल्यानंतर येथील ज्येष्ठ नागरिक, पालक यांना चिंता लागून होती. विशेषतः पालकवर्ग उपोषण करा, पण विद्यार्थी वाहतूक बंद करू नका, अशी मागणी करीत होता. सनियंत्रण समितीलाही निवेदन देण्यात आले होते. अखेर उपोषण स्थगित केल्याने त्यांना तात्पुरता दिलासा मिळाला आहे. माथेरान पालिका मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी संघटनेच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे.

### हातरिक्षा संघटनेचे नियोजित उपोषण स्थगित



आगामी सनियंत्रण समितीच्या बैठकीत उर्वरित ७४ हातरिक्षाचालकांची ई-रिक्षाची मागणी विषयपत्रिकेत घेण्यात येईल याची ग्वाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिली, तर सुप्रीम कोर्टाला जे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे, त्यात अधिकृत हातरिक्षाचालकांची यादी सादर केली आहे, अशी माहिती मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी श्रमिक रिक्षा संघटनेच्या सदस्यांना दिली. ई-रिक्षा संघटनेचे पदाधिकारी शकील पटेल, प्रकाश सुतार, सुनील शिंदे, जहूर चिपाडे, अली डोंगरे, नागेश कदम, शैलेश भोसले, रुपेश गायकवाड आदी उपस्थित होते.

> **सुप्रीम कोर्टाने ई-रिक्षांची संख्या ठरवण्याचा अधिकार सनियंत्रण समितीला दिला आहे. पायलट प्रोजेक्टचा संपूर्ण एक वर्षाचा कालावधी पूर्ण झाला आहे. पावसाळ्यात ई-रिक्षा सुरळीत चालल्या. त्यामुळे बाकी ७४ हातरिक्षा चालकांना ई-रिक्षाची परवानगी तत्काळ देण्यात आली पाहिजे.**
>
> **-शकील पटेल,**
> **अध्यक्ष, श्रमिक रिक्षा संघटना**

# राष्ट्रीय स्टार्टअप दिवसाचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते उद्या उद्घाटन

## देशभरातून एक हजार स्टार्टअप्सचा सहभाग

**मुंबई : प्रतिनिधी**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत राज्य नाविन्यता सोसायटीच्यावतीने एम्पॉवरींग इनोव्हेशन, एलिव्हेटिंग महाराष्ट्र या संकल्पनेवर आधारित 'राष्ट्रीय स्टार्टअप दिवस' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स येथील जिओ वर्ल्ड सेंटरमध्ये १६ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे,

महाराष्ट्रासह देशभरातील तंत्रज्ञान, कृषी, सेवा क्षेत्र, औषधनिर्माण तसेच पर्यटन अशा विविध क्षेत्रांतील १००० स्टार्टअप या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. अशी माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली आहे.



(संग्रहित छायाचित्र)

या कार्यक्रमास मेरीको लिमिटेडचे अध्यक्ष हर्ष मारीवाला, अपग्रेड अँड स्वदेस फाउंडेशनचे सह संस्थापक रॉनी स्क्रूवाला, नायकाच्या संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी फाल्गुनी नायर,व्हेंचर कॅपिटल अँड स्टार्ट अप्स गुगलचे जागतिक प्रमुख अपूर्वा चमरिया, ईव्ही कॅप वेंचर्सचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय पार्टनर विक्रम गुप्ता,अवेंडसचे सह-संस्थापक आणि कार्यकारी उपाध्यक्ष राणू वोहरा, इनक्युबेशन MGB इनोव्हेशन फाउंडेशन पार्टनर अध्यक्ष जिनेंद्र भंडारी,व्हेंचर कॅटालिस्ट अँड नाईन युनिकॉर्नचे सह-संस्थापक अपूर्व रंजन शर्मा, ब्लू स्मार्टचे सह-संस्थापक पुनीत गोयल,रेनट्री फाउंडेशनच्या संस्थापक आणि संचालिका लीना दांडेकर, ओपन सीक्रेटच्या संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अहाना गौतम, चलो मोबिलिटीच्या संचालक प्रिया सिंग, जिओ जेन नेक्स्टच्या प्रमुख अमेय माशेलकर, सुपर बॉटम्सच्या संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी उतगी, अस्थिरोग तज्ज्ञ आणि कलाकार सलोनी पटवर्धन उपस्थित राहुन आपल्या नावीन्यपूर्ण उपक्रमांचे सादरीकरण करणार आहेत.

मंत्री मंगल प्रभात लोढा म्हणाले की, दिवसभरात होणाऱ्या पॅनेल चर्चांमध्ये गुंतवणूकदारांच्या गरजा आणि युवा उद्योजकांच्या यशकथा यावर विशेष सत्रे आयोजित केली जाणार आहेत.

# परस्त्रीच्या नादाला लागून पत्नीला मारहाण आणि हुंड्याची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

शहरातील नात्याने पती पत्नी असलेल्या दाम्पत्यांमध्ये परस्त्री आल्याने भांडणे होऊ लागली. परस्त्री आपली मैत्रीण आहे आणि ती देखील याच घरात राहणार असे सांगून परस्त्रीला घरात आणून ठेवणाऱ्या नवरोबाने खऱ्या पत्नीला मारहाण करून भांडणे सुरु केली. या प्रकरणात नंतर लग्नाच्या पत्नीकडे माहेरून पाच लाखाची मागणी करून आर्थिक शोषण केल्याचा गुन्हा कर्जत पोलीस ठाण्यात दाखल झाला आहे.

कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०१ जानेवारी २० ते दि. २४डिसेंबर २४ दरम्यान मौजे विनायक अपार्टमेंट प्लॉट नं. ३०२, सुयोगनगर दहीवली येथील महिला यांनी आपल्या पती विरुद्ध कर्जत पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. नात्याने पती पत्नी असून त्यांचा दि.१४ऑक्टोंबर १३ रोजी प्रेमविवाह झाला आहे. त्यांना एक अपत्य मुलगी असुन ते एकत्र कुटुबात राहत होते.

फिर्यादी यांचे पती त्यांचे प्रेयसी सोबत प्रेमसंबंध ठेवून एकत्र राहत असल्याने त्याला फिर्यादी यांनी विरोध केला. या गोष्टीचा पतीने मनात राग धरून फिर्यादी यांना जेवण बनवता येत नाही, शिळ जेवण देणे, मी तुझ्या सोबत राहणार नाही, तुला नांदवणार नाही, असे घालुन पाडुन बोलुन शिवीगाळ करून हाताबुक्यांनी मारहाण केली. तसेच वडीलांकडुन घर घेण्यासाठी चार पाच लाख रूपये घेवुन ये, असा तगादा लावला.

फिर्यादी यांचे वडीलांनी घर घेण्यासाठी साडे चार लाख रुपये दिले असतांना देखील फिर्यादीला तुझ्या सोबत राहणार नाही, मला घराचे, गाडीचे व बॅकेचे कागदपत्रांची मागणी केली. फिर्यादी यांनी त्या गोष्टीला विरोध केला असता आरोपीत यास राग आल्याने त्यांनी मी तुला या घरात राहु देणार नाही तुझ्या आई वडीलांनी मला घर घेण्यासाठी कमी पैसे दिले आहेत. असे बोलुन फिर्यादी व त्यांची मुलगी हिस घाणेरडया भाषेत शिवीगाळ करून पत्नीला यांना वारंवार घाणेडया भाषेत शिवीगाळ करून हाताबुक्यांनी मारहाण करून शारीरीक मानसीक छळ जाच केला आहे. याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक महिला पोलीस निरीक्षक घोलप हे करीत आहेत.

# कर्जत रेल्वेस्थानकातील इंडिकेटरवर अर्धवट माहिती

## दादर, भायखळा स्थानके गायब




**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत रेल्वे स्थानकात लोकल गाड्यांसाठी नवीन इंडिकेटर बसविले आहेत परंतु त्या इंडिकेटरवर अर्धवट माहिती असल्यामुळे प्रवाशांमध्ये गोंधळ निर्माण होत आहे. हे इंडिकेटर्स त्वरित दुरुस्ती करावे. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते पंकज ओसवाल यांनी केली आहे.

कर्जत रेल्वे स्थानकात नुकतेच नवीन इंडिकेटर बसवले आहेत. प्रवासी या इंडिकेटरवर असलेल्या माहितीच्या आधारे प्रवासाचा निर्णय घेत असतो.परंतु नव्याने बसविलेल्यो इंडिकेटरवर अर्धवट माहिती असल्यामुळे प्रवाशांमध्ये गोंधळ निर्माण होत आहे.

सकाळी ९.४५ मिनिटांनी मुंबईला जलद लोकल आहे. सदर लोकल कल्याण पर्यंत सर्व स्थानकावर थांबते व पुढे डोंबिवली, दिवा, ठाणे, मुलुंड घाटकोपर, कुर्ला, दादर, भायखळा या स्थानकावर थांबते परंतु इंग्रजी भाषेत असलेल्या इंडिकेटरवर कुर्ल्या पर्यंत स्टेशनची नावे दिसतात आणि दादर व भायखळा येथे थांबा असुन सुद्धा इंडिकेटरवर दादर व भायखळा रेल्वे स्थानकाचे नाव येत नसल्यामुळे प्रवाशांमध्ये गोंधळ होत आहे.

# आमदार महेंद्र थोरवे यांचा जाहीर सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिळफाटा, खोपोली आणि खालापूर तालुका समस्त वैश्य वाणी समाजातर्फे आमदार महेंद्र थोरवे यांचा जाहीर सत्कार रविवारी (दि.१२) संगम रिसॉर्ट, शिळफाटा, खोपोली येथे आयोजित करण्यात आला होता.

कर्जत-खालापूरचे नवनिर्वाचित व कार्यसम्राट आमदार महेंद्र थोरवे यांनी खोपोली नगर परिषदेच्या हद्दीत बहुउद्देशीय इमारत बांधण्याचे ठरवले असून पहिला मजला वैश्यवाणी समाजासाठी फर्निचरसहित देण्याचे कबूल केले आहे. त्यासाठी लागणारा संपूर्ण निधी आमदारांनी मंजूरही केलेला आहे. त्यामुळे त्यांचे आभार मानण्यासाठी आणि या कामाची लवकरात लवकर पूर्तता होण्यासाठी वैश्यवाणी समाज शिळफाटा, खोपोली आणि खालापूर तालुकयाच्या वतीने आमदार महेंद्र थोरवे यांचा जाहीर सत्कार करण्यात आला .

# पाच महिन्यात ८५३ वीज चोरट्यांना महावितरणकडून कारवाईचा दणका

## ५ कोटी ८५ लाखांची वीजचोरी उघड

**नवी मुंबई : बातमीदार**

महावितरणच्या नवी मुंबई, पनवेलचा समावेश असलेल्या भांडुप परिमंडलात अधिक हानी असलेल्या वीजवाहिन्यांवर गेल्या पाच महिन्यांमध्ये व्यापक शोध मोहीम राबवून तब्बल ८५३ वीज चोरट्यांना कारवाईचा दणका देण्यात आला. त्यांच्याकडील ५ कोटी ८५ लाख रुपयांची वीजचोरी उघडकीस आणण्यात महावितरणच्या पथकाला यश आले आहे. अधिक हानी असलेल्या ६० वीजवाहिन्यांवरील सदोष मीटर बदलणे, नवीन वीजजोडणी, कमकुवत वीजतारा बदलणे आदीं विविध उपाययोजनांमुळे महसुलात ४० लाख १४ हजार ५४१ युनिट विजेची भर पडली आहे.

ऑगस्ट ते डिसेंबर २०२४ दरम्यान आखण्यात आलेल्या उपाययोजनांमध्ये ठाणे मंडल कार्यालयांतर्गत २५८ वीज चोरट्यांविरुद्ध कारवाई करून १ कोटी ७९ लाख रुपयांची वीजचोरी उघडकीस आणण्यात आली. वाशी मंडल कार्यालयातील ४०२ जणांकडे ३ कोटी ४७ लाख रुपयांची वीजचोरी सापडली.

पेण मंडल कार्यालयातंर्गत १९३ जणांकडे ५९ लाख रुपयांची वीजचोरी आढळली. तर अधिक वीज हानी असलेल्या ६० वाहिन्यांवरील ४ हजार ६५२ सदोष वीजमीटर बदलण्यात आले. ४ हजार ३४५ जणांनी नवीन वीजजोडणी देण्यात आली. कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित करण्यात आलेल्या १२४ ग्राहकांना पुनर्रजोडणी देण्यात आली. १३.४ किलोमीटर कमकुवत वीजतारा बदलण्यात आल्या व जवळपास १० किलोमीटर एरिएल बंच (इन्सुलेशन असलेली वाहिनी) बसवण्यात आली. परिणामी ठाणे मंडलात १० लाख २७ हजार ६७ युनिट, वाशी मंडलात सर्वाधिक २१ लाख ७९ हजार ४६१ आणि पेण मंडलात ८ लाख ८ हजार १३ युनिट विजेची वाढ नोंदवण्यात आली आहे.

मुख्य अभियंता सुनिल काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली वाशी मंडलाचे अधीक्षक अभियंता संजय पाटील, ठाणेचे युवराज मेश्राम आणि पेण राजाराम माने यांच्या नेतृत्वाखाली अभियंते, अधिकारी, जनमित्रांच्या चमुने ही कामगिरी केली.

# नो एन्ट्रीमधून प्रवास करणाऱ्यांवर कर्जत पोलिसांकडून अवरनेस मोहीम

**कर्जत : प्रतिनिधी**

शहरात नो एन्ट्री मधुन प्रवास करणाऱ्यांवर कर्जत पोलिसांकडून दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. वाहनचालकांमध्ये अवरमेस येण्याकरता चक्क नो एन्ट्री फलकाच्या समोर कर्जत पोलीस ठाण्याचे अधिकारी, वाहतूक पोलीस कर्मचारी उभे राहिले होते.

कर्जत शहरात होणाऱ्या वाहतूक कोंडीवर उपाय योजना करीत प्रशासनाकडून मुख्य बाजारपेठेत वन वे वाहतूक सुरू केली आहे. तरीही काही दुचाकी वाहनचालक नो एंट्री मधून प्रवास करत आहेत. त्यांच्यावर वाहतूक पोलीसांनी कारवाया करुन ही सुधारणा होत नसल्याचे दिसुन आले.

सोमवारी कर्जत पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक सुनिल चव्हाण, वाहतूक पोलीस शाखेचे पोलीस गणेश बोऱ्हाडे हेच बाजारपेठेतील नो एंट्री फलका जवळ उभे राहून कर्जतकरांना शिस्त लावण्याचा प्रयत्न करत होते.



# द.ग. तटकरे कनिष्ठ महाविद्यालय इमारतीच्या दुसऱ्या मजल्याचे भूमिपूजन

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात इंदापूर विभाग शिक्षण प्रसारक मंडळाला अधोरेखित महत्व प्राप्त झाले असल्याचे गौरोदगार खासदार तथा संसदीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक गॅस समिती भारत सरकार अध्यक्ष सुनील तटकरे यांनी इंदापूर येथे बोलताना काढले.



माणगाव तालुक्यातील इंदापूर विभाग शिक्षण प्रसारक मंडळ इंदापूरच्या द.ग.तटकरे कनिष्ठ महाविद्यालय नियोजित इमारतीच्या दुसऱ्या मजल्याच्या बांधकामाचा भूमिपूजन सोहळा मंगळवार (दि. १४) रोजी दुपारी २ वाजता खासदार तटकरे यांच्या हस्ते झाला.

या वेळी इंदापूर विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष शेखरशेठ देशमुख, जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष काका नवगणे, जेष्ठ नेते दत्ताशेठ पाटील, चंद्रकांत राऊत, माणगाव पंचायत समितीचे माजी उपसभापती अविनाश मांडवकर, भुवन ग्रामपंचायतीचे सरपंच दिपकशेठ जाधव, उदय अधिकारी,बाळा खातू, मेघनाथ सातपुते, रुपेश तोडकर आदींसह प्राचार्य, शिक्षकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारीवृंद, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी मार्गदर्शन करताना खासदार तटकरे यांनी सुरवातीलाच सर्व उपस्थितांना मकरसंक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी त्यांनी संस्थेचे अध्यक्ष शेखरशेठ देशमुख यांच्या सामाजिक, शैक्षणिक,सहकार,राजकीय क्षेत्रातील कार्याचा गौरव करीत त्यांना ८० व्या वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. खा. तटकरे पुढे म्हणाले कि,इंदापूर विभागाने मला भरपूर प्रेम दिले असल्याने त्यामुळे इथे आल्यावर मला नेहमीच मनस्वी आनंद वाटतो. या संस्थेतील विद्यार्थ्यांचे गुणकौशल्य बघून मला आनंद वाटतो. या शिक्षण संस्थेत सर्व दूर पद्धतीचे शिक्षण दिले जाते. या पुढील काळात रोजगाराभिमुख अभ्यासक्रमाची आवश्यकता आहे. रोजगार निर्मितीचे शिक्षण घेतले पाहिजे त्याचबरोबर छोटे-मोठे व्यवसाय केले पाहिजे. येणाऱ्या काळात या सर्व परिसरात वेगवेगळे उद्योगधंदे पुढील दहावर्षात इंदापूरचे महत्व वाढणार असल्याचे त्यांनी सांगून,इंदापूर शिक्षण संस्थेतील विद्यार्थी मोठमोठ्या पदावर जातील अशी अशा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी आपल्या प्रास्तविकात बोलताना इंदापूर विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष शेखरशेठ देशमुख म्हणाले कि,आपल्या शिक्षण संस्थेला खा.सुनील तटकरे साहेबांनी नेहमीच मोलाचे सहकार्य केले आहे. याठिकाणी विज्ञान,वाणिज्य,कला अशा सर्व शाखा सुरु आहेत. या संस्थेचे जे काही प्रश्न,अडीअडचणी असतील त्या तटकरे साहेब नेहमीच सोडवीत असतात. याची जाणीव आपल्याला असून त्याची उत्तरही करण्याचा आमचा संचालक मंडळ निश्चितच प्रयत्न करेल असे देशमुख यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन महाविद्यालयाचे प्रा.शब्बीर हज्जू यांनी केले.

पान १ वरुन



## पतंग महोत्सवातून मकरसंक्रातीचा आनंद द्विगुणित

या वेळी महोत्सवाचे आयोजक युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष सुमित झुंजारराव, रोशन ठाकूर, प्रवीण मोरबाळे, अमेय देशमुख, आदित्य देशमुख, संदीप पाटील, संतोष कुंवर, स्वरूप वाणी यांच्यासह लहानग्यांपासून ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. उपस्थित सर्वांनी महोत्सवाचा आनंद घेत एकमेकांना मकरसंक्रातीच्या शुभेच्छा दिल्या.

# कोन फाटा येथे वाहतूक नियमांबाबत प्रबोधन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी वाहन चालकांकडून वाहतुकीच्या नियमांचे पालन व्हावे याकरिता नवी मुंबई वाहतूक पोलिसांकडून सणांचे औचित्य साधून उपायुक्त तिरुपती काकडे हे वाहनचालकांना अनोख्या उपक्रमांचे धडे देत असतात. मंगळवारी (दि. १४) मकरसंक्रांत सणाचे औचित्य साधून वाहनचालकांना वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत संबोधित करून तिळगुळ वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला.

कोन फाटा येथे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी पोलीस उपनिरीक्षक सुशांत खराटे, पोलीस हवालदार संजय गावडे, सुनील पाटील, शैलेंद्र तंवर यांनी वाहनचालकांना वाहतुकीचे नियम पाळणे आवश्यक असून वाहन चालवत असताना मोबाईलवर न बोलणे, सेफ्टी बेल्ट लावणे, हेल्मेट परिधान करणे, लेन कटिंग न करणे याबाबत सूचना दिल्या.

# राज्य सरकारतर्फे यंदापासून महाविद्यालयीन मराठी एकांकिका स्पर्धा

## सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांची घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत यंदापासून प्रथमच राज्यस्तरीय महाविद्यालयीन मराठी एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. तालीम, प्राथमिक आणि अंतिम फेरी अशा तीन फेऱ्यांमधून होणाऱ्या या स्पर्धेतून नवे उदयोन्मुख कलाकार उदयाला येतील, असा विश्वास राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड. आशिष शेलार यांनी व्यक्त केला.

राज्यात काही नामांकित संस्थांद्वारे एकांकिका स्पर्धा घेतल्या जातात. तर राज्य सरकारतर्फे राज्य स्तरावरील मराठी, संगीत, हिंदी, संस्कृत, बालनाट्य आणि व्यावसायिक नाट्य स्पर्धा घेतल्या जातात. या स्पर्धांच्या धर्तीवर यंदापासून महाविद्यालयीन तरुणांमधील कलेला उत्तेजन देण्यासाठी मराठी एकांकिका स्पर्धा भरविली जाणार आहे.

अंतिम फेरीतील विजेत्या एकांकिकेला गुणानुक्रमे १ लाख, ७५ हजार आणि ५० हजार रुपयांचे पारितोषिक दिले जाणार आहे. त्याचबरोबर उत्कृष्ट बोलीभाषा एकांकिकेसाठी ५० हजार रुपयांचे प्रथम बक्षीस ठेवण्यात आले आहे. तसेच उत्कृष्ट दिग्दर्शन, प्रकाश योजना, नेपथ्य, रंगभूषा, संगीत दिग्दर्शन, वेशभूषा, अभिनय अशी बक्षीसेही दिली जाणार आहेत.

**तीन फेरीमध्ये होणार स्पर्धा**

तीन फेऱ्यात होणाऱ्या या स्पर्धेत राज्यातील ३६ जिल्ह्यातील ३६ केंद्रांवर तालीम फेरी पार पडेल. तालीम फेरीत सादर होणाऱ्या एकांकिकेची प्राथमिक फेरीत निवड होईल. या निवड झालेल्या संघांना एकांकिकेच्या तयारीसाठी दहा हजार रुपये नाट्य निर्मिती खर्च दिला जाणार आहे. त्यानंतर राज्यातील सहा महसूली विभागाच्या मुख्यालयात प्राथमिक फेरी होणार आहे. तर मुंबईत अंतिम फेरी संपन्न होईल.

या स्पर्धेचे नियोजन सांस्कृतिक कार्य संचालनालय या विभागामार्फत करण्यात येणार आहे. आज विभागाची अर्थसंकल्पीय आढावा बैठकीत या विषयाच्या आर्थिक तरतूद व नियोजनाबाबत मंत्री आशिष शेलार यांनी घोषणा केली.

# विद्यार्थ्यांसाठी श्रमसंस्कार शिबिर

## भाजप पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत हस्ते शुभारंभ





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या पनवेलमधील महात्मा फुले कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागा अंतर्गत विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. १३ ते १९ जानेवारीदरम्यान होणाऱ्या या शिबिराचा शुभारंभ रयतचे जनरल बॉडी सदस्य तथा भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते सोमवारी (दि.१३) झाले. पनवेल तालुक्यातील शांतिवन येथे हे शिबिर होणार आहे.

विद्यार्थ्यांना राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचे स्वच्छता-श्रमप्रतिष्ठेचे महत्व समजावे आणि सहकार्य वृत्ती वाढावी म्हणून महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या मार्फत श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. १३ ते १९ या कालावधीमध्ये युवकांचा ध्यासः शाश्वत ग्राम विकास ही संकल्पना घेऊन हे शिबिर राबवण्यात येणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना पथनाट्य प्रशिक्षण, सर्प विज्ञान, सोशल मिडीया, राष्ट्रीय सेवा योजनेतून व्यक्तिमत्व विकास, भारतीय राज्य घटनेचे नैतिक आधारस्तंभ, आपत्ती व्यवस्थापन, व्यसनमुक्ती या विषयांवर व्याख्यानमालेद्वारे मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या श्रमसंस्कार शिबिराच्या शुभारंभावेळी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य महेंद्र घरत, भाजपचे तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, महात्मा फुले महादिव्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, व्हाईस प्रिन्सीपल आर.ए.पाटील, आर.पी.म्हात्रे, गोवे सर, औचीते सर, जे.व्ही बोरगावे यांच्यासह शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# तळोजात कारच्या धडकेत एकाचा मृत्यू, महिला गंभीर

**पनवेल : वार्ताहर**

भरधाव वेगाने आलेल्या चारचाकी कारने दोघांना उडवल्याची घटना तळोजा एमआयडीसीत घडली. यातील एकाचा मृत्यू झाला आहे तर महिला गंभीर जखमी झाली आहे.

याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात टाटा नेकसोन कार (पीबी ०८ ईबी ३७३७) वरील चालक परविन रोशनलाल ग्रोवर (वय ५३ रा. अतुल्य बिल्डिंग, टाटा मंत्रा, कल्याण) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले.

१४ जानेवारी रोजी सकाळी ए वन वडापाव तळोजा एमआयडीसीसमोर आयजीपीएल ते नावडे लेनवर टाटा नेकसोन कार (पीबी ०८ ईबी ३७३७) वरील चालक परविन ग्रोवर याने कार भरधाव वेगाने चालवली आणि पायी चालत जाणाऱ्या लालू नारद तांटी (रा. पडघे गाव, मूळ बिहार) आणि महिला प्रमिलादास याना धडक दिली. या अपघातात लालू तांटी (वय २५) याचा मृत्यू झाला तर प्रमिला दास या गंभीर जखमी झाल्या. त्यानंतर या कारने इको कारला ठोकर मारून तिचे नुकसान केले.

## कारची टेम्पोला धडक; तीन जण जखमी

**पनवेल :** टेम्पोला कारने पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या अपघातात तिघेजण जखमी झाले. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली.

यातील पिकअप टेम्पोवरील चालक अल्लाउद्दीन इसाक शेख (वय २८ वर्ष, रा. भिवंडी) हा त्याच्या ताब्यातील टेम्पो भिवंडी ते महाबळेश्वर घेऊन जात असताना त्यास झोप आल्याने त्याच्या ताब्यातील टेम्पो पहिल्या लेनवर थांबवला. त्याच्या पाठीमागून आलेली इको स्पोर्ट कारवरील चालक मनीष आनंदा हरणे (वय ३०, रा. विरार) हा त्या टेम्पोला पाठीमागून जोरदार धडकला.

या अपघातात अनिता हरणे यांच्या डोक्यात दुखापत झाली. तर आनंद हरणे, अक्षय हरणे हेदेखील जखमी झाले. त्यांना एमजीएम हॉस्पिटल, कामोठे येथे रवाना करण्यात आले. अपघातस्थळी महामार्ग पोलीस, पळस्पे मोबाईलवरील स्टाफ, आयआरबी स्टाफ, देवदूत स्टाफ उपस्थित होते.

# उलवे नोडमधील एमएनएम आणि टीएनजी कॉलेजचे स्नेहसंमेलन उत्साहात

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली सोहळा






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या उलवे नोड मधील मोरु नारायण म्हात्रे विद्यालय आणि तुकाराम नारायण घरत जुनियर कॉलेज ऑफ सायन्सच्या भव्य प्रांगणात २९वे वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण सोहळा जय संहिता या शीर्षकाखाली सोमवारी (दि.१३) मोठ्या उत्साहात झाला.

हा सोहळा संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षेतेखाली झाला. या वेळी शाळेच्या वार्षिक अहवालाचे अनावरण लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर शाळेच्या मुख्याध्यापिका प्रणिता गोळे यांनी शालेय अहवालातून शैक्षणिक आणि सहशालेय उपक्रमातून शालेय प्रगतीची वाटचाल, तालुका, जिल्हा आणि विभागीय स्पर्धांमधील विद्यार्थ्यांचा उंचावत असलेल्या प्रगतीच्या आलेखाची माहिती दिली. या वेळी झालेल्या पारितोषिक वितरण सोहळ्यामध्ये विविध स्पर्धेमध्ये यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला.

या सोहळ्यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थित मान्यवरांची मने जिंकली. या वेळी जनार्दन भगत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, कामगार नेते महेंद्र घरत, जनार्दन भगत शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय टी. देशमुख, न्हावे ग्रामपंचायतचे सरपंच विजेंद्र पाटील, संस्थेचे सदस्य वसंत पाटील, गव्हाण ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच माई भोईर, माजी उपसरपंच विजय घरत, हेमंत ठाकूर, जयवंत देशमुख, शाळेचे स्थानीय चेअरमन भार्गव ठाकूर, राधाताई ठाकूर, रयत शिक्षण संस्थेच्या शालेय समितीचे सदस्य विश्वनाथ कोळी, अनंता ठाकूर, वामन म्हात्रे, ग्रामपंचायतीच्या माजी सदस्या योगिता भगत, उषा देशमुख, उलवे नोड अध्यक्ष निलेश खारकर, किशोर पाटील, साई भोईर, श्रीकांत घरत, रघुनाथ देशमुख, कमलाकर देशमुख, रवींद्र देशमुख, सुदर्शन घरत, दयानंद घरत, भाऊ भोईर, एन. सी घरत, वि के ठाकूर, जयश्री घरत, राजेश खारकर, रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे, रयत उलवे शाखेच्या मुख्याध्यापिका ठाकूर मॅडम, चांगु काना ठाकूर प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, रामशेठ ठाकूर ज्युनिअर कॉलेजच्या मुख्याध्यापिका नायर मॅडम, चंद्रकांत भोईर, दीपक आहुजा, मीनाक्षीताई पाटील, शाळेच्या मुख्याध्यापिका प्रणिता गोळे, पर्यवेक्षक अरुण जोशी यांच्यासह पदाधिकारी, शिक्षक, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांची बैठक



**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात माजी विद्यार्थी संघटनेतर्फे शनिवारी (दि.११) माजी विद्यार्थ्यांसाठी बैठकीचे आयोजन केले होते.

या बैठकीसाठी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या विकासासाठी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी म्हणून सहकार्य करू तसेच भविष्यात महाविद्यालयात आजी विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळे उपक्रम घेतले जातील असे त्यांनी आश्वासन दिले. या बैठकीचा प्रमुख उद्देश महाविद्यालयातील आजी व माजी विद्यार्थ्यांमधील नाते दृढ व्हावे व त्याचा फायदा महाविद्यालयाच्या विकासासाठी व्हावा हे होते.

प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी माजी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या सभेचे आयोजन प्रा. महेश धायगुडे यांनी केले तसेच माजी विद्यार्थी संघटनेतील इतर सर्व सदस्य व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# कामोठे विद्यालयात लोकनेते दि.बा. पाटील जयंती साजरी



**कामोठे : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे कामोठे येथील लोकनेते दि.बा.पाटील विद्यालयात प्रकल्पग्रस्तांचे कैवारी लोकनेते दि.बा.पाटील यांची जयंती साजरी करण्यात आली.

या जयंती कार्यक्रमावेळी विद्यालयाच्या स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन जयदास गोवारी, व्हाईस चेअरमन विनायक म्हात्रे, माजी चेअरमन व शिक्षणप्रेमी स्वामी आप्पा म्हात्रे, विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक गावंड सर उपस्थित होते. दि.बा.पाटील साहेबांचे बालपण, शिक्षण व त्यांची आंदोलन याची माहिती करण केदार, लौकिक वनगे, वेदांत जाधव, श्रुतिका जानकर, तन्वी पयेर, कार्तिक जाधव, धनश्री जानकर या या विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून सांगितली. विद्यालयातील खुटले सर, सौ. पाटील. डी यांनी दि.बा. पाटलांच्या कार्याची माहिती सांगितली.

विद्यालयाचे माजी चेअरमन शिक्षणप्रेमी स्वामी मात्रे यांनी दि.बा. पाटील व कामोठे गाव यांच्या जुन्या आठवणी सांगून विद्यार्थ्यांना प्रेरित केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋषभ पांगुळ व आभार रोहिणी कांबळे यांनी मानले. या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन दहावी अ वर्गाच्या वर्गशिक्षिका फडतरे व्ही.व्ही. मॅडम यांनी केले.

दरम्यान, या शाळेत विद्यार्थ्यांसाठी विकासात्मक उपक्रम राबविले जातात.



**पनवेल : भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी ज्येष्ठ कार्यकर्ते शांताराम पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.**



**पनवेल : पाली देवद ग्रामपंचायतचे उपसरपंच दिवेश बुवाशेठ भगत यांना वाढदिवसानिमित्त माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, पालीदेवद विभागीय अध्यक्ष किशोर सुरते, पाली देवद पंचायत समिती अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील, सुकापुर गावाध्यक्ष राजेश पाटील, पनवेल तालुका चिटणीस यतीन पाटील, सुकापूर युवा मोर्चा अध्यक्ष महेश केणी, पनवेल तालुका युवा मोर्चा उपाध्यक्ष राहुल पोपेटा, भाजप ज्येष्ठ नेते शशिकांत पाटील, युवा नेते दीपक भगत यांनी शुभेच्छा दिल्या.**

## लोकशाही दिनी पाच अर्ज प्राप्त

**पनवेल :** कोकण विभागीय लोकशाही दिन कोंकण भवनमध्ये अप्पर आयुक्त संजीव पलांडे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या वेळी नागरिकांनी तक्रारी मांडल्या. त्यांच्या समस्या जाणून प्रकरणे उचित कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालयांकडे पाठविण्यात आली.

कोंकण विभागीय स्तरावर आतापर्यंत झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण प्रलंबित अर्जांची संख्या ११ असून आज आलेल्या अर्जांची संख्या पाच आहे, असे एकूण प्राप्त अर्ज १६ होते त्यापैकी एक अर्ज निकाली काढण्यात आला आहे. त्यापैकी १५ अर्ज प्रलंबित आहेत.

## तरुणी हरवल्याची तक्रार



**पनवेल :** एका कारमध्ये बसून एक तरुणी कुठेतरी निघून गेल्याने ती अद्याप घरी न परतल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे. नीशा लखन गुडेन (२२ रा.चेंबुर) ही बार डान्सर असून तिचा रंग सावळा, अंगाने मध्यम, उंची पाच फुट, डोक्याचे केस काळे, डोळे काळे असून अंगामध्ये लाल जॅकेट व गुलाबी लेगिझ, कानामध्ये रिंग, नाकामध्ये फुली, उजव्या हातामध्ये रिंग घातलेली आहे. तिला हिंदी भाषा अवगत आहे. सोबत मोबाईल फोन आहे. ती वेलवेट हॉटेल येथून गाडी (एमएच-१२-एलडी-०४२३) या गाडीमध्ये बसून ती कुठेतरी निघून गेली आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी शहर पोलीस ठाणे (०२२२७४५२३३३) किंवा पो.हवा.संदीप पेटे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पनवेल महापालिकेच्या सर्व शाळांचे स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या दहा शाळा व इंग्लीश मिडीयम शाळांचे वार्षिक स्नेहसंमेलन तसेच बक्षीस वितरण समारंभ सोमवारी (दि.१३) आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये उत्साहात झाले.

या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमांचे उद्घाटन शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी अधिक्षक किर्ती महाजन तसेच सर्व शाळांचा शिक्षकवृंद उपस्थित होते. अतिरीक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त प्रसेनजीत कारलेकर व सहाय्यक आयुक्त स्मिता काळे यांच्या मार्गदर्शनाखाली हे स्नहेसंमेलन घेण्यात आले. स्नेहसंमलेन कार्यक्रमांबरोबरच बक्षिस वितरणाचा कार्यक्रमही यावेळी घेण्यात आला. स्नहेसंमेलनामध्ये उत्तम सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले.

महाराष्ट्राची लोकपरंपरा जपत पनवेल महापालिकेच्या शाळांचे यावर्षीचे स्नेहसंमेलन 'महाराष्ट्राची लोकधारा' या संकल्पनेवर आधारित करण्यात आले. महाराष्ट्राच्या लोकपरंपरेमध्ये पिढ्या न पिढ्या गायली जाणारी, नृत्य केली जाणारी धनगरी गीते, गवळण, बाल्या डान्स, वासुदेव, तारपा नृत्य, कोळीगीते, शेतकरी गीते, कोकणी गीते, गोंधळ यावर आधारित या स्नेहसंमेलनामध्ये विद्यार्थ्यांनी सादीकरण केले. गणपती स्तवनाने सुरूवात झालेल्या कार्यक्रमांमध्ये सकाळी सगळयांना जागे करत येणाऱ्या वासुदेवाच्या गाण्याने वातावरण प्रफुल्लीत केले, त्यानंतर आई जगदंबेचा उदो उदो करत विद्यार्थ्यांनी गणा धाव रे गणा पाव रे म्हणत बाल्या नाच केला तसेच धनगरीची मेंढरे गाण्यावर धनगरांचे आयुष्य सादर केले. महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये असणारी वेशभुषा दर्शविणारा खास 'फॅशन शो'ही विद्यार्थ्यांनी या वेळी सादर केला. या वेळी विद्यार्थ्यांचा उत्साह ओसांडून वाहन होता.

या वेळी बोलताना शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांनी पुढील वर्षी शिक्षकांच्या देखील स्पर्धा घेण्यात येणार सांगितले. दरम्यान, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या वेळी मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते.

### बक्षीस मिळालेल्या यशस्वी शाळा

**मोठा गट**

प्रथम क्रमांक: शाळा ०६ धाकटा खांदा
द्वितीय क्रमांक : शाळा क्रमांक ०८ पोदी नवीन पनवेल
तृतीय क्रमांक : शाळा क्रमांक४ कोळीवाडा पनवेल

**छोटा गट**

प्रथम क्रमांक – शाळा ०६धाकटा खांदा
द्वितीय क्रमांक : लोकनेते दिबा पाटील शाळा क्रमांक ०१
तृतीय क्रमांक : शाळा क्रमांक ९ गुजराती शाळा शाळा क्रमांक ०८ पोदी नवीन पनवेल

## संपादकीय

# भारतीयांचा दबावगट हवा

अमेरिकेचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे देशाचे ४७वे राष्ट्राध्यक्ष म्हणून २० जानेवारी रोजी कार्यभार स्वीकारणार आहेत. ट्रम्प सत्तेत आल्यानंतर अन्य देशांतून अमेरिकेत स्थलांतरित होणाऱ्या नागरिकांवर बंधने लादली जाण्याची शक्यता असल्याची जोरदार चर्चा सध्या सुरू आहे. त्यामुळे अमेरिकेत नोकरी किंवा शिक्षणासाठी गेलेल्या भारतीयांच्या चिंतेत वाढ झाली आहे.

**अमेरिकेतील स्थलांतरितांच्या संदर्भात आपण धोरणात्मक बदल करणार असल्याची घोषणा ट्रम्प यांनी केली होती. त्यामुळे अमेरिकेतील प्रमुख विद्यापीठांकडून आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना २० जानेवारीपूर्वी आपल्या मायदेशी परतण्यास सांगितले जात आहे. विद्यापीठांनी सत्ताबदलाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक सूचनाही लागू केल्या आहेत. एच१बी व्हिसावरून अमेरिकेतील सत्ताधारी रिपब्लिकन पक्षात समर्थक व विरोधक गट निर्माण झाले आहेत. या व्हिसाद्वारे अमेरिकेत स्थलांतरितांचे स्वागत केले जाते तसेच अमेरिकेतील कंपन्या परदेशी कर्मचारी नेमू शकतात. या व्हिसाद्वारे दरवर्षी साधारण ८५ हजार परदेशी कर्मचाऱ्यांना सामावून घेतले जाते. यातच अमेरिकेत शिक्षणासाठी आलेल्या वीसेक हजार तरुणांनाही नोकरी देता येते. यात आधी तीन वर्षे व तीन वर्षांची मुदतवाढ अशी सहा वर्षे अमेरिकेत राहता येते. ट्रम्प यांनी आपल्या पहिल्या कार्यकाळात एच१बी व्हिसाबाबत नकारात्मक भूमिका घेतली होती. या व्हिसाची संख्या कमी करण्याचा विचारही त्यांनी बोलून दाखवला होता. उजव्या विचारांचे लोक हे व्हिसासंबंधी धोरण बदलावे अशी मागणी करत आले आहेत. अमेरिकेत कर्मचारी वा तज्ज्ञ मिळाले नाहीत तरच अन्य देशांतून कर्मचारी मागवावेत असाही नियम आहे. ट्रम्प यांनी याआधीच्या कार्यकाळात या व्हिसावर अनेक निर्बंध आणले. अमेरिकेत प्रतिवर्षी ६५ हजार परदेशी कर्मचाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या या एकूण व्हिसांपैकी ६६ टक्के व्हिसा भारतीयांना दिला जातो. या व्हिसाधारकांचा पगार वाढवण्याचा निर्णय मधल्या काळात घेतला गेला. मात्र, अमेरिकेतील स्थानिकांना संधी उपलब्ध व्हावी म्हणून ही पगारवाढ करण्यात आली. काही कंपन्यांनी स्वस्तात विदेशी कर्मचारी नेमण्याकरिता या व्हिसाचा वापर केला. त्यामुळे अधिक कुशल अमेरिकी नागरिकांची संधी हुकली तसेच वेतनही खाली घसरले. अमेरिकेत आजपावेतो चार लाख भारतीयांना एच१बी व्हिसा मिळाला आहे तर २० लाख लोकांना ग्रीनकार्ड म्हणजे नागरिकत्व मिळाले आहे असे सांगितले जाते. स्थलांतरितांना विरोध वाढू लागला तेव्हा प्रारंभी अमेरिकेतील अनेक भारतीयांना हा विरोध बेकायदा स्थलांतर करणाऱ्यांना आहे असे वाटले. कारण वास्तविक अमेरिकेत भारतीय वंशाच्या अमेरिकी नागरिकांची संख्या अवघी १.३५ टक्के इतकीच आहे. परंतु त्यांचे वार्षिक उत्पन्न मात्र सर्वसाधारण अमेरिकी नागरिकाच्या दुप्पट असल्याचे दिसून येते. अनेक मोठ्या अमेरिकी कंपन्यांच्या प्रमुखपदी भारतीय आहेत. तसेच अमेरिकेतील ६० टक्के हॉटेलेही भारतीयांची आहेत. अमेरिकी अर्थव्यवस्थेसमोरील संकटांमुळे या संपन्न भारतीय गटाविरोधात स्थानिकांचा रोष वाढतो आहे. २०२०पर्यंत डेमोक्रॅटिक पक्षाच्या पाठिशी असणारे भारतीय यंदाच्या अध्यक्षीय निवडणुकीत ट्रम्प यांच्या पाठिशी उभे राहिले. परंतु त्यामुळे एच१बी व्हिसासंदर्भातील संभाव्य बदलांवर परिणाम होईल असे म्हणता येणार नाही. आता यापुढे भारतीयांचा दबावगट अमेरिकेत कशाप्रकारे काम करतो यावर बरेच काही अवलंबून आहे असा तज्ज्ञांचा सूर दिसतो. भारताचे राजनैतिक कौशल्यही त्याकरिता पणाला लावावे लागणार आहे. ट्रम्प यांनी २० तारखेला कार्यभार स्वीकारल्यानंतर यासंदर्भात नेमके काय घडते त्याकडे सर्वसंबंधितांचे लक्ष लागले आहे.**

# भारावून टाकणाऱ्या क्षणांच्या अविस्मरणीय आठवणी

**गेले तीन दिवस म्हणजे १०,११,१२ जानेवारी २०२५, अतिशय आनंद, उत्साह आणि भारावून टाकणाऱ्या क्षणांचे गेले. निमित्त होतं रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा आणि चांगू काना ठाकूर (स्वायत्त) महाविद्यालय ह्यांनी आयोजित केलेली 'अटल करंडक' ह्या राज्यस्तरीय मराठी एकांकिका स्पर्धेची अंतिम फेरी. मी आणि मानसीने ह्या स्पर्धे च्या प्राथमिक फेरीसाठी परीक्षण केले होते आणि जवळपास शंभर एकांकिकांमधून निवडक पंचवीस एकांकिकांचे अंतिम फेरीत सादरीकरण होणार होते. प्राथमिक फेरीचे परीक्षक म्हणून आलेला अनुभव ह्यापूर्वीच सादर केलेला आहे. आता ह्या स्पर्धेच्या अंतिम फेरीचा, भाग दोन आज सादर करीत आहोत.**

याची देही याची डोळा तीन दिवसीय नाट्य सोहळा ह्या निमित्ताने अनुभवता आला. शुक्रवार, दिनांक १० जानेवारी – सकाळच्या सत्रात सुमधुर नांदी आणि श्रीराम स्तुती गीताने ह्या सोहळ्याची सुरुवात झाली आणि स्पर्धेचे मुख्य आयोजक मा. आमदार प्रशांत ठाकूर ह्यांच्या शुभहस्ते ह्या अंतिम फेरीचे उद्घाटन झाले.

ह्या अंतिम फेरीत सादर झालेल्या एकांकिकांमध्ये विषयांचे प्रचंड वैविध्य होते. त्याचा थोडक्यात आढावा खालीलप्रमाणे : 'सखा'–कृष्ण आणि सुदामा ह्यांच्या पुराणातील दोस्तीची आधुनिक काळातील कथा, 'न्युरालिंक'–मृत पत्नीशी थेट संवाद साधणारी आधुनिक विज्ञानातील काल्पनिक कथा, 'वर्तुळ'–वडिलांच्या कलाकार होण्याच्या अतृप्त इच्छेला मुलाने दिलेले सरप्राईज, 'कलम ३७५'–पुरुषांवर महिलांकडून होणाऱ्या अत्याचाराबद्दल कायद्याने काय करता येऊ शकेल ह्याचा केलेला उहापोह, 'कुक्कुर'–जास्त प्रामाणिक कोण? आणि निरपराध बळी कुणाचा जातो? ह्याचे वर्णन करणारे भेदक वास्तव, 'क्रॅक्स इन द मिरर'–नैतिकता, पुरुषी अहंकार, पत्नीवर घेतलेला संशय ह्यावर भाष्य करणारे कौटुंबिक कथानक, 'पिंडग्रान'–मृतदेहावर अंतिम क्रिया करण्यापूर्वी एका जमातीमध्ये असलेल्या अनिष्ट प्रथेविरोधात भाष्य करणारे भीषण वास्तव, 'गुड बाय किस'–रंगभूमीशी असलेले नाते दृढ करणारी मनोरंजक कथा, 'जुगाड लक्ष्मी'–शिक्षणाने अज्ञानी असलेल्या व्यक्तीने उच्च शिक्षित व्यक्तीला विचार करायला लावेल असा केलेला मोठ्ठा जुगाड, 'पसायदान'–पसायदानातील प्रत्येक ओळीने मनुष्यधर्माबद्दल केलेले भाष्य, 'व्हाय नॉट?'–विवाहापूर्वी भावी पती पत्नींनी आग्रहाने वैद्यकीय चाचण्या करून घेणे किती आवश्यक आहे ह्याचे भान देणारे कथानक, 'ब्रह्मपुरा'–जाती भेद, वर्णव्यवस्था संपविणाऱ्या एका नगरीची काल्पनिक कथा, 'जीन जीन झिंगाट'–भविष्यातील आपले होणारे मुल कसे असावे ? ह्यावर भाष्य करणारी वैज्ञानिक पार्श्वभूमीवरील एकांकिका, 'सर्पसत्र'–तरुणांमधील वाढता संताप आणि अविचाराने होऊ शकणारे नुकसान ह्यावर भाष्य करणारे कथानक, 'ऑलमोस्ट डेड'–परदेशी राहणाऱ्या आणि मायभूमीतील कर्तव्य विसरणाऱ्या व्यक्तींना धडा देणारे थरारनाट्य, 'चिनाब से रावी तक'–फाळणीच्या पार्श्वभूमीवरील हृदयद्रावक कथानक, 'देव–बाप्पा?'–अप्रतिम मूकनाट्य, 'हनिमून'–धमाल विनोदी नाट्य, 'गोंद्या आणि कमूचा फार्स'–एकमेकांशी विवाह होऊ न शकलेल्या प्रेमी युगुलाची कहाणी, 'जापसाल'–दशावतारी कलावंताची झालेली फरफट, 'अविघ्नेया'–विशेष मुलीची (special child) रंजक कहाणी, 'बॉईल्ड–शुध्द शाकाहारी'–पती पत्नीमधील नाते कसे असावे ह्यावर भाष्य करणारी वारकरी कुटुंबाची अप्रतिम कथा, 'बॉडी ऑफ नरेवाडी' –तंटामुक्त गावातील अनपेक्षित होणाऱ्या तंट्यावर मनोरंजक पद्धतीने केलेले सादरीकरण, 'पाटी'–शब्द महत्वाचे की भावना? पती पत्नीमधील नाते जपणारे विलक्षण बोलके चित्रण असलेले सादरीकरण, 'वेदना सातारकर.. हजर सर'–तरुणाईचे काव्य नाट्य.

यादी बघितली की लक्षात येते ते वैविध्यपूर्ण विषयांची हाताळणी आणि त्यांचे सादरीकरण. जवळपास सर्वच एकांकिकांचे लेखन गेल्या एक दोन वर्षात झालेले म्हणजे नवीनच संहिता. नव्या पिढीचे तरुण लेखक, दिग्दर्शक व कलावंत ह्यांची उल्लेखनीय कामगिरी. ध्वनी, प्रकाश, नेपथ्य, रंगभूषा, वेशभूषा, प्रसंगांना अनुरूप गीतलेखन, गीतगायन, गीत संगीत ह्या सारख्या सर्वच तांत्रिक बाबींचा प्रभावी वापर, समूह नाट्य करताना असलेला एकत्रित सहभाग, वेळेत सर्व गोष्टी करण्याचे कौशल्य ह्या सगळ्या गोष्टी एकांकिकेचे उत्तम सादरीकरण करताना कलावंत आणि तंत्रज्ञांनी घेतलेली मेहनत प्रकर्षाने जाणवत होती. प्रत्येक एकांकिका सुरू होण्यापूर्वी बॅक स्टेजला जाऊन संघांची तयारी अनुभवणे आम्हाला विलक्षण वाटत होते. ह्या एकांकिकांच्या अंतिम फेरीसाठी परीक्षक म्हणून सुप्रसिद्ध रंगकर्मी सुकन्या कुलकर्णी, देवेंद्र पेम आणि विराजस कुलकर्णी होते म्हणजेच लेखन, दिग्दर्शन आणि अभिनय ह्यांचा संगम असणारे जाणकार परीक्षक असल्याने निकाल विचारपूर्वक आणि उत्तम असणार ह्याची खात्री होतीच. स्पर्धेच्या निमित्ताने 'गौरव रंगभूमीचा' ह्या सदराखाली ज्येष्ठ दिग्दर्शक आणि अभिनेते श्री. सतीश पुळेकर ह्यांना गौरविण्यात आले तसेच अभिनेते जयवंत वाडकर खास हजर होते. स्पर्धेला विशेष ब्रँड अँबेसेडर असतो, ह्या वर्षी हा मान अभिनेत्री रुचिरा जाधव हिला मिळालेला आहे. स्पर्धेच्या प्राथमिक फेरीच्या विविध केंद्रांवरील केंद्र प्रमुखांचा सन्मान केला जातो. अंतिम फेरीचे आयोजन दृष्ट लागण्यासारखेच होते. प्रवेशद्वाराजवळ दिवंगत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी ह्यांचा भव्य कट आऊट, त्यांच्या कार्याची माहिती देणारा फलक, प्रमुख पाहुणे, परीक्षक, मार्गदर्शक ह्यांचे फोटो असलेले फलक, सर्व अंतिम फेरीतील सहभागी संस्थांच्या एकांकिकांची माहिती असणारे क्रिएटिव्ह्ज, सहभागी अंतिम फेरीतील स्पर्धकांसाठी स्वागत कक्ष, सर्व स्पर्धकांसाठी नाश्ता, चहाची विशेष व्यवस्था, रसिकांसाठी उपहार गृहाची व्यवस्था, सर्व एकांकिकांचे चित्रीकरण, प्रेक्षक प्रतिक्रियांसाठी व्यवस्था, सेल्फी पॉइंट्स ह्या सर्व गोष्टींची काळजीपूर्वक केलेली तयारी आणि अंमलबजावणी तसेच स्पर्धक, रसिकांचे प्रसन्न मुद्रेने स्वागत करणारे अटल करंडक चे सर्व कार्यकर्ते.

आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह तिन्ही दिवस गर्दीने फुलून गेले होते. मुख्य प्रेक्षागारासह बाल्कनीदेखील हाऊसफुल्ल करणारी मला वाटतं महाराष्ट्रातील ही एकमेव स्पर्धा असावी. दोन एकांकिकांच्या मध्ये रसिकांसाठी वेगवेगळे प्रश्नोत्तरांचे खेळ, त्यासाठी बक्षिसे, सवलत कूपन देणे ह्यासारख्या गोष्टींनी रसिकांचादेखील प्रचंड उत्साह अनुभवला.

श्यामराव पुंडे, अमोल खेर, अभिषेक पटवर्धन, गणेश जगताप, चिन्मय समेळ, वैभव बुवा ह्यांच्यासारख्या जबाबदार संयोजकांच्या साथीने सीकेटी महाविद्यालयाचे विद्यार्थी स्पर्धेच्या अंमलबजावणीत जी मेहनत घेत होते त्याबद्दल शब्द अपुरे पडतील. केवळ निमंत्रित नाहीत तर सर्वच रसिक प्रेक्षक, स्पर्धक ह्यांचे हसतमुखाने स्वागत करणे, त्यांच्या समस्यांचे निवारण त्वरित करणे, आवश्यक ती मदत करणे ह्या सर्व गोष्टी हे विद्यार्थी हसतमुखाने, तत्परतेने आणि शिस्तीने करीत होते हे नाट्यकलेची प्रचंड आवड असल्याशिवाय घडूच शकत नाही आणि त्याबद्दल त्यांचे विशेष कौतुक करणे खरंच आवश्यक वाटते.

सरतेशेवटी ह्या सर्व आयोजनाचे मुख्य आयोजक आमदार प्रशांत ठाकूर, स्पर्धा प्रमुख परेश ठाकूर आणि त्यांचे मार्गदर्शक माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर ह्यांचे विशेष कौतुक. ह्या कलाप्रेमी मंडळींच्या सढळ हाताने केलेल्या मदतीच्या जोरावर ही स्पर्धा पूर्वी मल्हार करंडक नावाने सात वर्ष आणि अटल करंडक नावाने गेली अकरा वर्षे म्हणजेच सलग १८ वर्ष सातत्याने सुरू आहे. एखादा उपक्रम सुरू करणे आणि त्याहीपेक्षा तो सातत्याने सुरू ठेवणे, दिवसेंदिवस दर्जा उंचावत जाणे, सहकारी मंडळींवर विश्वास ठेवून त्यांना अंमलबजावणीसाठी स्वातंत्र्य देणे, पण त्याचवेळी सर्व गोष्टींवर प्रभावी नियंत्रण ठेवणे आणि प्रत्येक गोष्टीवर बारीक नजर ठेवून उपक्रम यशस्वी करणे ही साधी सोपी गोष्ट नाही. कलाक्षेत्राला राजाश्रय हवाच, पण कार्यकर्ते आणि कलावंतांना मुक्त स्वातंत्र्य असेल तर उपक्रम कसे यशस्वी करता येतात ह्याचे उत्तम उदाहरण म्हणून अटल करंडकच्या आयोजनाचे स्थान नक्कीच पहिल्या क्रमांकावरचे असेल.

पैसा आहे त्यामुळे न करायला काय हरकत आहे ? असा तिरकस सूर काही जणांचा कदाचित असू शकेल, पण केवळ पैसा असून उपयोग नसतो तर त्या बरोबरच नियंत्रण, दृष्टिकोन, प्रामाणिक प्रयत्न, अंमलबजावणीसाठी लागणारी मानसिकता व स्वातंत्र्य ह्या गोष्टीदेखील तितक्याच महत्वाच्या असल्याने निरोगी वातावरणात ही स्पर्धा वर्षानुवर्षे आपले नांव उंचावत आहे. ह्या वर्षापासून अटल करंडक परिवाराचा भाग झाल्याने आम्हाला हे अभिमानाने व्यक्त करावेसे वाटत आहे.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या मध्यवर्ती शाखेने अश्या दर्जेदार आणि सुनियोजित उपक्रमांना नाट्यकलावृद्धीसाठी बळ आणि प्रोत्साहन देणे आवश्यक आहे असे मनापासून वाटते. ह्या स्पर्धेशी जोडलेले नाते दिवसेंदिवस दृढ होत जाईल ह्याची नक्की खात्री आहे. ह्या स्पर्धेशी संबंधित सर्व मंडळींविषयी भरपूर प्रेम आणि कृतज्ञता!.. धन्यवाद!..

**–आशीर्वाद आणि मानसी मराठे**

## बदलते तंत्रज्ञान

### बजाजने नवीन पल्सर आर एस २०० केली लाँच

नवीन वर्षाच्या सुरुवातीला बजाज ऑटोने त्यांच्या लोकप्रिय मोटारसायकल रेंज पल्सरमध्ये आणखी एक मोठे अपडेट घेऊन आले आहेत. यावेळी कंपनीने फुली–फेअर्ड बजाज पल्सर RS200 ला काही व्हिजीबल मायक्रो–अपडेट्ससह पुन्हा बाजारातलाँच केले आहे, जे काही काळापासून विक्रीसाठी उपलब्ध नव्हते. नवीन



अपडेट मिळाल्यानंतर, या सेगमेंटमधील स्पर्धकांमध्ये, विशेषतः KTM² RC200 मध्ये या मोटरसायकलला एक नवीन लूक मिळाला आहे. RS200 चे नवीन मॉडेल त्याच्या जुन्या मॉडेलपेक्षा किती वेगळे आहे आणि त्यात कोणते प्रमुख बदल आहेत.

**२०२५ बजाज पल्सर आरएस २०० – काय बदला आहे?**

नवीन पल्सर आरएस२०० चे पहिले व्हिज्युअल आकर्षण म्हणजे ग्राफिक्स, ज्यामध्ये एक मोठे अपडेट दिसून आले आहे, ज्यामुळे मोटरसायकलला स्पोर्टी लूक मिळाला आहे आणि फेअरिंगला चांगले पूरक आहे. पुढील अपडेट म्हणजे टेल सेक्शन, जो अरुंद आहे आणि त्यात अपडेटेड स्प्लिट एलईडी टेल लॅम्प डिझाइन आहे. अपडेट मायक्रो लेव्हलवर आहे परंतु नवीन बजाज पल्सर आरएस२०० ला एक नवीन लूक मिळाला आहे.

जुन्या आवृत्तीच्या तुलनेत, नवीन आरएस२०० मध्ये फोन कनेक्टिव्हिटी आणि नेव्हिगेशनसह एलसीडी इन्स्ट्रुमेंट कन्सोल आहे. गेल्या काही महिन्यांत अपडेट केलेल्या सर्व पल्सरशी ते सुसंगत आहे. मोटरसायकलमध्ये आता ड्युअल–चॅनेल एबीएस आणि कस्टमाइझ करण्यायोग्य राइड मोड आहेत.

२०२५ बजाज पल्सर आरएस२०० – काय बदला पॉवरमध्ये? फ्रंट डिझाइन, हेडलाइट सेटअप आणि १७–इंच व्हिल, टेलिस्कोपिक फ्रंट सस्पेंशन, मागील बाजूस मोनोशॉक, दोन्ही टोकांवर डिस्क ब्रेक आणि एलईडी लाइटिंग असे बहुतेक सायकलिंग भाग आधीच्या मोटरसायकलपासून बनवलेले आहेत. इंजिनमध्येही बदल करण्यात आला आहे, जो १९९ सीसी सिंगल–सिलेंडर लिक्विड–कूल्ड युनिट आहे जो सहा–स्पीड गिअरबॉक्सशी जोडलेला आहे. अशा प्रकारे नव्या पल्सर आरएस २०० या बाईकमध्ये विविध फिर्चस चालकांसाठी उपलब्ध आहेत.

# ऑलिंपिक पदक विजेते खाशाबा जाधव



**निमित्त**

खाशाबा जाधव हे एक ऑलिंपिक पदक विजेते भारतीय कुस्ती खेळाडू आहेत. इ. स. १९५२ मधे हेलसिंकी येथे झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धे त खाशाबा जाधव यांनी फ्रीस्टाइल कुस्ती प्रकारात कांस्यपदक जिंकले. खाशाबा जाधव यांनी जिंकलेले हे पदक तेव्हा ऑलिंपिक स्पर्धेतील स्वतंत्र भारताचे पहिले वैयक्तिक पदक होते. या पदकामुके भारताला एक नवीन उमेद मिळाली. खाशाबा जाधव यांनी केलेली ही खूप मोठी कामगिरी होती, त्यांच्याबद्दल आपण अधिक जाणून घेऊ या.


खाशाबा जाधव यांचा जन्म १५ जानेवारी १९२५ रोजी सातारा जिल्ह्यातील, करडा तालुक्यात गोलेश्वर गावात झाला. खाशाबा जाधव यांना ४ भावंडे होती. खाशाबा यांचे वडील दादासाहेब हे ख्यातनाम पैलवान होते. ते तरुणांना कुस्तीचे शिक्षण देखील द्यायचे. त्यामुळे खाशाबा जाधव यांच्यात कुस्ती ही जन्मापासून होती असे म्हणता येईल. खाशाबा जाधव यांनी कराड तालुक्यात असणाऱ्या टिळक हायस्कूल मधे आपले शिक्षण घेतले. बालपणापासून दादासाहेबांनी खाशाबा यांना कुस्तीचे प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली होती शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर खाशाबा जाधव हे महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी कोल्हापूरला गेले. तेथे त्यांनी राजाराम महाविद्यालयात आपले शिक्षण पूर्ण केले. या काळात त्यांना बाबुराव बाळवडे आणि बेलपुरी गुरुजी यांनी कुस्तीचे प्रशिक्षण दिले आणि मार्गदर्शन केले.

१९५२ सालची ऑलिम्पिक स्पर्धा हि हेलसिंकी येथे होणार होती. या स्पर्धेसाठी खाशाबा जाधव यांची बॉटमवेट गटात म्हणजे ५७ किलो वजन गटात निवड झाली.

१९५२ क्या ऑलिम्पिक स्पर्धेत निवड होण्या अगोदर त्यांना ऑलिम्पिक कार्यकारी मंडळाकडून सांगण्यात आले होते की त्यांची निवड होणार नाही. त्यावेळेस मद्रास येथे राष्ट्रीय निवड प्रक्रियेत मुद्दाम खाशाबा जाधव यांना एक मार्क कमी देण्यात आला. पण हे सर्व बघून खाशाबा जाधव यांनी पटियालाचे महाराजांना त्यांच्यावर झालेला अन्याय सांगितला आणि न्यायासाठी विनंती केली. त्यांनी तक्रारींकडे विशेष लक्ष दिले आणि त्यांच्या विरोधी कुस्तिगरासोबत पुन्हा खाशाबा यांची कुस्ती लावण्यात आली. या कुस्तीत खाशाबा जिंकले आणि त्यामुळे त्यांची ऑलिम्पिक स्पर्धेसाठी निवड झाली.

पण खाशाबा यांच्याकडे ऑलिम्पिक स्पर्धेस जाण्यासाठी पैसे नव्हते. अशावेळी गावातील सर्व लोकांनी वर्गणी गोळा करून जाण्यासाठी पैसे जमा केले. खाशाबा यांच्या महाविद्यालयाचे प्राचार्य बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर यांनी खाशाबा यांना जाण्यासाठी स्वतःचे घर बँकेकडे गहाण ठेवून ७००० ची मदत केली.सन १९५२ मधील हेलसिंकी येथील ओलिपिक स्पर्धेत खाशाबा जाधव सोबत २४ स्पर्धक होते. या स्पर्धेत खाशाबा जाधव हे सेमी फायनल्स पर्यंत पोहचले. तोपर्यंत त्यांनी जर्मनी, कॅनडा, मेक्सिको यांच्यासोबत झालेल्या स्पर्धा जिंकल्या होत्या. खाशाबा जाधव यांनी या स्पर्धेत कांस्य पदक जिंकले. खेळताना दोन चुका झाल्या म्हणून त्यांचे सुवर्ण पदक हुकले. खाशाबा जाधव यांनी जिंकलेले हे कांस्य पदक वैयक्तिक पातळीवर स्वतंत्र भारताला मिळालेले पाहिले ऑलिम्पिक पदक ठरले.

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

### डायबेटीस नियंत्रणात ठेवणे एकदम सोपे!

डॉक्टरांच्या 'या' ५ टिप्स करा फॉलो अन् मिळवा आराम डायबेटीसपासून मुक्त मिळवण्यासाठी या पाचटिप्सफॉलो करुन पाहा. हल्ली अनेकांना डायबेटीसमुळे विविध समस्यांना सामोरे जावे लागते. मनाप्रमाणे काही खाता येत नाही,



शरीर थकल्यासारखे वाटते, वारंवार लघवी होते अशा अनेकगोष्टींचा त्रास डायबेटीसच्या रुग्णांना होत असतो. त्यामुळे अशा लोकांना आहाराची फार काळजी घ्यावीलागते. ज्यांच्या मदतीने तुम्ही डायबेटीसपासून मुक्त राहू शकता.

१) प्रथिने आणि फायबरयुक्त संतुलित आहार घेतल्यास रक्तातील साखरेचे प्रमाण कमी होते. पण, त्यानंतरच्या जेवणामुळे ग्लायसेमिक प्रतिसादावरही सकारात्मक परिणाम होतो.

२) तुम्ही काय खाता यापेक्षा तुम्ही कधी आणि कसे खाता याला अधिक महत्व आहे. दिवसाच्या सुरुवातीला कार्बोहायड्रेट्स खाणे इन्सुलिनची पातळी वाढवते.कार्बो हायड्रेट्सयुक्त पदार्थ खाण्यापूर्वी प्रोटीन आणि स्टार्च नसलेल्या भाज्यांचे सेवन केल्याने ग्लुकोजचे प्रमाण नियंत्रणात राहते. त्याशिवाय रक्तातील साखरेची पातळी स्थिर होते.

३) डायबेटीस नियंत्रणात ठेवण्यासाठी व्यायाम खूप महत्त्वाचा आहे. परंतु, त्याची एक ठरावीक वेळ ठरवणे आरोग्याच्या दृष्टीने फायदेशीर आहे. चालणे किंवा मध्यम शारीरिक हालचालींमुळे इन्सुलिन रेजिस्टन्स वाढतो. तसेच जेवणानंतर चालल्याने ग्लुकोजची वाढ कमी होते आणि त्यामुळे एकूण ग्लायसेमिक नियंत्रण सुधारते.

४) शरीरातील चयापचय क्रिया सुधारण्यासाठी चांगली झोप आवश्यक आहे. झोपेच्या खराब पद्धतीमुळे इन्सुलिनची पातळी वाढते.भूक नियंत्रित करण्यासाठी आणि रक्तातील साखरेची पातळी स्थिर करण्यासाठी दररोज सात ते नऊ तासांची चांगली झोप गरजेची आहे.

५) डायबेटीस नियंत्रणात ठेवताना अनेकदा हायड्रेशनकडे दुर्लक्ष केले जाते. त्यात पाणी किंवा हर्बल टी हे डायबेटीसच्या रुग्णांसाठी चांगले पर्याय आहेत. त्यामुळे चयापचय क्रिया सुधारुन भूकही नियंत्रणात राहते. रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात ठेवण्यासाठी शक्यतो कोल्डड्रिंक्स पिणे टाळा.

# मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते पळसगाव खुर्द येथे रस्त्याचे लोकार्पण

**माणगाव : बातमीदार**

तालुक्यातील पळसगाव खुर्द ते पळसगाव बुद्रुक या जोड रस्त्याचे लोकार्पण ना. भरतशेठ गोगावले यांच्या हस्ते सोमवार (दि. १३ )रोजी गांगवली ग्रामपंचायत हद्दीतील पळसगाव खुर्द येथे करण्यात आले.

पळसगाव खुर्द ते पळसगाव बुद्रुक हा जोड रस्ता अनेक वर्ष डांबरीकरण होत नसल्याने ह्या रस्त्यावरून ये-जा करणाऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. या रस्त्याची मागणी नामदार भरतशेठ यांच्याकडे करताच त्यांच्या पाठपुराव्याने ६० लाख रुपये या रस्त्यासाठी त्यांनी मंजूर केले.



या कार्यक्रम प्रसंगी बोलताना ना.भरतशेठ गोगावले म्हणाले की, पळसगाव खुर्द ते पळसगाव बुद्रुक या जोड रस्त्याची मागणी ग्रामस्थांनी करताच अर्थसंकल्प योजनेअंतर्गत ६० लाख रुपये खर्च हा रस्ता पूर्ण करण्यात आला. या रस्त्यावरूनच होळी सणानिमित्त पालखी जात असते. या रस्त्याच्या कामाबरोबरच पळसगाव खुर्द येथील मारुती मंदिराचे जीर्णोद्धार तसेच गावाशेजारी धरणाचे काम लवकर सुरू करण्यात येईल असे सांगुन ते पुढे म्हणाले की, गावातील तरुणांनी नोकरी धंद्यानिमित्त शहराकडे न जाता शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन आपल्या गावातच स्वयंरोजगार करून आपले जीवन समृद्ध करावे. निजामपूर ते पाचाड या रस्त्याला ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित झाल्या आहेत. त्या शेतकऱ्यांच्या काही अडचणी आहेत त्या अडचणी ही लवकरच दूर केल्या जातील.

या कार्यक्रमाला उपजिल्हाप्रमुख सुरेश महाडिक, युवा सेना सचिव ॲड.अच्युत तोंडलेकर, नितीन पवार, संतोष पोळेकर, उपसरपंच अनिल वनगुले, पळसगाव खुर्द ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष महेश कांबळे, मुंबई मंडळाचे अध्यक्ष भरत वरणकर, ग्रामपंचायत सदस्य,ग्रामसेवक प्रदीप साळवी, सचिन पालवे, ग्रामस्थ मंडळ, महिला मंडळ, मुंबईकर मंडळ उपस्थित होते.

# मच्छिमारांचा व्यवसाय संकटात; उपाययोजना करण्याची मागणी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

दक्षिण महाराष्ट्रातील कोकण किनारपट्टीवरील मच्छिमारांचा व्यवसाय सध्या गंभीर संकटातून जात आहे. गेल्या काही महिन्यांत समुद्री वादळे, अवकाळी पाऊस यामुळे मच्छिमारांना मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागला आहे. त्यातच, दक्षिणेकडील खराब वाऱ्यांच्या तीव्रतेमुळे समुद्रातील मच्छिमारी देखील ठप्प झाली आहे. या संकटामुळे ज्यामुळे त्यांचे जीवन आणि व्यवसाय संकटात सापडले आहेत.मच्छिमारांवर उपासमारीची वेळ आली आहे,

गेल्या वर्षी झालेल्या समुद्री वादळामुळे आणि चक्रीवादळामुळे मच्छिमारांचे कामकाज पूर्णपणे विस्कळित झाले. समुद्रात फाटलेली जाळे, इतर आर्थिक संकटे यामुळे मच्छिमारांचे जीवन अवघड झाले आहे. अधिकच चिंतेची बाब म्हणजे, समुद्रातील नैसर्गिक बदलामुळे मासेमारीला असाधारण कष्ट आणि खर्च लागतो आहे.

मच्छिमारांना बोटी चालवण्यासाठी लागणारा डिझेल, बर्फ, ऑईल आणि

**“ दक्षिणेकडील वाऱ्यामुळे गेल्या महिनाभरापासून मच्छिमारी व्यवसाय ठप्प झाला आहे, ज्यामुळे आर्थिक संकट ओढवले आहे. डिझेल, बर्फ, ऑईल आणि खलाशी पगारांसाठी लागणारे खर्च वाढले असून, कुटुंबाचा उदरनिर्वाहही कठीण झाला आहे. अशा परिस्थितीत शासनाने तातडीने मच्छिमारांसाठी विशेष पॅकेज जाहीर करणे अत्यंत आवश्यक आहे, जेणेकरून त्यांचे जीवन पुन्हा सुरळीत होईल.**

**– हरिओम चोगले ,**
**माजी सरपंच भरड्खोल, मच्छिमार नेते**

**“ खराब हवामानामुळे मच्छिमार गेल्या महिनाभरापासून ठप्प आहेत. यामुळे मच्छिमारीवर अवलंबून असणारे छोटे-मोठे व्यावसायिक देखील गंभीर आर्थिक संकटात सापडले आहेत. कर्ज दिवसेंदिवस वाढत असून, मासे न मिळाल्यामुळे बँकेचे कर्ज भरता येत नाही. अशा परिस्थितीत शासनाने तातडीने दखल घेऊन मच्छिमारांसाठी उपाययोजना कराव्यात.**

**काशिनाथ जंजिरकर, मच्छिमार श्रीवर्धन**

खलाशी वर्गाच्या पगाराची अडचण मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. त्यावर सरकारची उदासीनता आणि खाजगी बँकांमार्फत घेतलेले कर्ज भरणे अवघड झाले आहे.यामुळे मच्छिमारांच्या परिवारावर आर्थिक संकट आणखी गडद होत आहे.

श्रीवर्धन, मुळगाव, बागमांडला, शेखाडी, दिवेआगर, आदगाव, दिघी, कुडगाव आणि इतर किनारपट्टी भागातील मच्छिमारांच्या बोटी आता नांगरलेले आहेत. तेथे शुकशुकाट पसरलेला आहे, मच्छिमारांचे आता समुद्रातील माशांवर आधारीत व्यवसाय बंद झालेत

त्यामुळे मच्छिमारांच्या कुटुंबावर आर्थिक संकटांचे जाळे घट्ट होत आहे. हवेच्या हालचाली आणि समुद्रातील अनिश्चिततेमुळे एकूणच जीवन संघर्ष बनले आहे. शासनाने जर वेळेत दखल घेतली नाही, तर मच्छिमारांचा व्यवसाय पूर्णपणे ठप्प होऊ शकतो,



# वक्तृत्व स्पर्धेत वडघर मुद्रेचे सरस्वती हायस्कूल अव्वल

**माणगाव : बातमीदार**

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याणच्या विविध शाळांमधून दरवर्षी नवनवीन उपक्रम घेतले जातात. यावर्षी संस्थेने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे सांस्कृतिक, सामाजिक ,राजकीय कार्य,अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनपट अशा विषयावर वक्तृत्व स्पर्धेत सरस्वती विद्या मंदिर वडघर मुद्रे अव्वल ठरली आहे .

छत्रपती शिक्षण मंडळाच्या रायगड विभागीय वक्तृत्व स्पर्धेत कै. शंकर सिताराम देशमुख संकुलाच्या सरस्वती विद्या मंदिर वडघर मुद्रे



हायस्कूलच्या इ.८ वीतील विराज सचिन कदम व इ.९ वीतील भक्ती राम सावरटकर यांनी संस्था पातळीवर कल्याण येथे झालेल्या वक्तृत्व स्पर्धेत अनुक्रमे व्दितीय आणि उत्तेजनार्थ अशी पारितोषिके प्राप्त केली.

याबद्दल या दोन्ही विद्यार्थ्यांना संस्था पदाधिकार्यांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षक बंधू- भगिनींचे कौतुक केले.

सरस्वती हायस्कूल सतत विविध उपक्रमातून प्रावीण्य प्राप्त करीत असते. विविध शालेय, सहशालेय,सामाजिक व राष्ट्रीय कार्यात आपली चुणूक दाखवते. हे यश प्राप्त करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक गजानन पाटील संस्थेचे सर्व पदाधिकारी मार्गदर्शन व प्रेरणा देतात.

## माणगाव येथे एटीएम फोडण्याचा प्रयत्न

**माणगाव : बातमीदार**

माणगाव येथे बँक ऑफ बडोदाचे एटीएम मशीन मधील पैसे कव्हर उपटुन चोरी करण्याचा प्रयत्न करण्यात आला

माणगाव उपजिल्हा रूग्णालया समोर साबळे यांचे इमारती मधील तळ मजल्यावर बँक ऑफ बडोदाचे एटीएम मशिन आहे.१२ जानेवारी रोजी रात्री मशीन मधील पैसे चोरण्याच्या उददेशाने चोरटयाने एटीएम मशीनच्या आतील कव्हर उपटुन चोरी करण्याचा प्रयत्न केला. तसेच एटीएम मशीन मधीन सी.सी. टी.व्ही कॅमेरा तोडुन नुकसान केले.

आरोपी श्रीराम दया विश्वकर्मा वय ३५ रा. उत्तर प्रदेश याला दि. १३ जानेवारी रोजी अटक करण्यात आली आहे. पोलीस उपनिरीक्षक विकास चव्हाण करीत आहेत.

# बेरोजगारीवर सामुहिक शेती उत्तम पर्याय -जिल्हा कृषी अधीक्षक वंदना शिंदे

**धाटाव : प्रतिनिधी**

निवी येथील सामूहिक शेतीला जिल्हा कृषी अधीक्षक वंदना शिंदे यांनी मंगळवारी भेट देत कृतिशील प्रयोगाचे भरभरून कौतुक करुन बेरोजगारीवर सामूहिक शेती हा उत्तम पर्याय असल्याची प्रतिक्रिया शिंदे यांनी यावेळी मनोगतातून व्यक्त केली.



बळीराजा फाऊंडेशन रोहा संचालित युवा कृषी उद्योग निवी तरुणांनी पूर्णतः यशस्वी केलेल्या सामूहिक शेतीला जिल्हा कृषी अधीक्षक वंदना शिंदे यांनी मंगळवारी भेट दिली. नोकरदार, व्यवसायिक तरुणांनी एकत्र येन तब्बल ६ एकर शेतीत कलिंगड, भाजीपाला, कडधान्याची शेती केली. तरुणांत आवड निर्माण व्हावी, तरुण शेतीकडे वळावा, शेती फायद्याची असल्याचे समोर यावे, याच उद्देशाने हा कृतीशील शेती प्रयोग सुरू झाला. विविध संस्था यांच्या सहकार्यातून सामुहिक शेती प्रयोग यशस्वी ठरत आहे.

कृषी अधीक्षक वंदना शिंदे व कृषी अधिकाऱ्यांनी सामूहिक शेतीला भेट दिल्याने सामुहिक शेती ब्रॅन्डची चर्चा रोहा बरोबरच जिल्ह्यात सुरू झाली आहे. सामुहिक शेतीच्या प्रयोगातून तरुणांत अधिक आवड निर्माण होत आहे. अनेक ठिकाणी सामुहिक शेतीचा प्रयोग करण्याचा आमचा मनोदय आहे अशी भावना बळीराजा फाउंडेशनचे संस्थापक राजेंद्र जाधव यांनी व्यक्त केली.

युवा कृषी उद्योग निवी येथील सामुहिक शेतीची मंगळवारी अधीक्षक वंदना शिंदे यांनी पाहाणी केली, माहिती घेत सहभागी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी आत्मा प्रकल्पाचे संचालक अतिश बोऱ्हाडे, तालुका कृषी अधिकारी महादेव करे, मंडळ कृषी अधीक्षक ए एस सुतार, कविता दोरगुडे प्रकाश राक्षीकर, बळीराजा फाऊंडेशनचे अध्यक्ष विठ्ठल मोरे, संस्थापक राजेंद्र जाधव, सचिव ड दीपक भगत, युवा कृषी उद्योग सामुहिक शेतीचे प्रशांत राऊत, जितेंद्र तुपकर, बाळा भगत, विनायक पाटील, नितेश बामगुडे, शेतकरी, कृषी अधिकारी उपस्थित होते.

यावेळी सामुहिक शेतीतील कलिंगड, भाजी कडधान्य शेतीची पाहणी केली. शेतीसाठी लागणाऱ्या पाण्यासाठीचे बंधारे शेतकऱ्यांच्या अडचणीची माहिती घेतली. पावसाळी पाण्याचा प्रवाह ओहोळवर कृषी विभागाच्या माध्यमातून मोठा बंधारा बांधण्याचे अप्रत्यक्ष संकेत शिंदे यांनी चर्चेतून शेतकऱ्यांना दिले. नोकरी व्यवसाय सांभाळून तरुण दुसऱ्याच्या पडीक जागेत सामुहिक शेती करतात, त्यातून आनंद घेत शेतीतील फायद्याचा शोध घेतात हे पाहून खूप समाधान वाटले. सामुहिक शेती हे बेरोजगारीवर उत्तम पर्याय ठरू शकते अशी प्रतिक्रिया वंदना शिंदे यांनी दिली.

तरुणांत आवड निर्माण व्हावी, पडीक शेती लागवडीत यावे, यासाठीच आम्ही हा प्रयोग हाती घेतला आहे. कालव्याच्या पाण्यासाठी संघर्ष चालूच आहे. कालव्याला पाणी आले तर संबंध परिसर हिरवेगार होईल अशी तळमळ राजेंद्र जाधव यांनी बोलून दाखवली.

# लोधिवली ग्रामपंचायत माझी वसुंधरा अभियान करणार यशस्वी

**चौक : प्रतिनिधी**

माझी वसुंधरा अभियान ५.०मध्ये खालापूर तालुक्यातील ग्रामपंचायती सरसावल्या असून ग्रूप ग्रामपंचायत लोधिवली यांनी ग्रामस्थांच्या सहकार्याने काम करण्यास जोमाने सुरुवात केली असल्याने या परीसरात पर्यावरण पूरक वातावरणाची निर्मिती होण्यास सुरुवात झाली.

माझी वसुंधरा अभियान ५.० मध्ये लोधिवली ग्राम पंचायत यांनी भाग घेतल्यावर घनकचरा व्यवस्थापन,प्लॅस्टिक संकलन सिंगल युझ प्लास्टिक मुक्ती गाव,रोपवाटीक निर्मिती करून वृक्ष रोपण आणि संवर्धन, कृषी कचरा यावर बंदी, ई कचरा वर्गीकरण, महीला व बचत गटाच्या माध्यमातून रांगोळी काढून जन जागृती,शालेय विद्यार्थी यांचा सहभाग घेऊन निबंध स्पर्धा,वकृत्व स्पर्धा, चित्र कला स्पर्धा घेऊन व प्रभात फेरी काढून जन जागृती करण्यात येतं आहे,

तरुणांनी दिवाळीत, सणवार,मिरवणूक व अन्य कार्यक्रमात फटाके वाजवणार नाहीअशी प्रतिज्ञा केली. पर्यावरण पुरक गणेशोत्सव साजरे करण्याचा संकल्प सोडून,पाणी आडवा पाणी जिरवा ही योजना राबवुन नदी व नाल्यावर बंधारे बांधण्यात येत आहे.व्यापार्यांनी प्लास्टिक पिशव्या वापरणार नसल्याची शपथ घेतली.महीलांनी ओला सुखा कचरा.याचे वर्गीकरण करून कंपोस्ट खत व्यवस्थापण केले आहे.

सौर उर्जेचा वापर सूरू असुन त्यासाठी सामाजिक संस्थाांची मदत घेण्यात येत आहे. वातावरणाची निर्मिति साठी प्रयत्न केले जात आहेत.




## महाराष्ट्र शासन

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

**निविदा सूचना क्रमांक ८९ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालीलप्रमाणे **बी-१** नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा / बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | मौजे कोंढवी ता. पोलादपुर राखीव भितीचे बांधकाम करणे, जि रायगड | ३,४१,९०,९९७/- | १,७१,०००/- | २५,५४०/- | १२ महिने | आवश्यकता नाही |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **१४/०१/२०२५** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **२८/०१/२०२५** वेळ १८.०० वाजेपर्यंत. |
| २ | निविदा पुर्व बैठक | मा. मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, कोकण मर्झबान रोड, फोर्ट मुंबई यांचे कार्यालयात दि. २१.०१.२०२५ रोजी दु. १२.०० वाजता |
| ३ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | अधीक्षक अभियंता, (सा.बां.) मंडळ , कोकण भवन नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक १३/०३/२०२४ वेळ १२.०० वाजता |

**टिप :-** परिपूर्ण निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धिपत्रके तसेच इतर काही दुरूस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/ १९१**
**दिनांक : १३/०१/२०२५**

**सही/**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**



**REQUIRED**

Required 2 Salesman for sale of Industrial products in Raigad region. Candidate should be minimum 12th Pass, owning 2 wheeler & living in Khalapur Area

**CONTACT NO 7057294777**
email: admin_delta@deltabombay.com



**प्रपत्र -१**

**महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम ६० अन्वये फक्त सभासदांसाठी अधिमंडळाची विशेष बैठकीची सुचना**

रायगड जिल्हा सहकारी वाहतुक संस्था मर्या अलिबाग ता. अलिबाग जि. रायगड या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची अधिमंडळाची विशेष बैठक श्री. प्रवीण दळवी, प्राधिकृत अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ३ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी/दुपारी ११.०० वाजता संस्थेच्या कार्यालयात पुढील कामाकाजाकरीता बोलविण्यात येत आहे. तरी कृपया सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

सभेचा विषय : रायगड जिल्हा सहकारी वाहतुक संस्था मर्या अलिबाग ता. अलिबाग जि. रायगड सहकारी संस्थेचे व्यवस्थापन समितीचे निवडणुकीसाठी सन २०२४-२५ ते २०२९-३० या कालावधीसाठी उपविधीतील तरतुद क्र. ४२ अन्वये १३ जागांसाठी निवड करणे

**दिनांक : १४/०१/२०२५**

**सही/-**
**बाबुराव खेडेकर**
**सचिव**

**विशेष सुचना-**

संस्थेची सदरची अधिमंडळाची विशेष बैठक गणपुर्ती (कोरम) अभावी तहकुय झाल्यास तो बैठक त्याच दिवशी अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी होईल. त्यास गणपुर्तीची आवश्यकता असणार नाही. या सभेत मुळ सभेच्या विपय पत्रिकेवरील विषयावर चर्चा होईल.



**JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA'S**

**CHANGU KANA THAKUR ARTS, COMMERCE AND SCIENCE COLLEGE, NEW PANVEL (AUTONOMOUS)**

**Plot No-01,Sector-11,Khanda Colony, New Panvel (W) Dist-Raigad, State-Maharashtra, India PIN-410206**

Re-accredited 'A++' Grade by NAAC (CGPA 3.52,4th Cycle)
College with Potential for Excellence' Status Awarded by UGC.
'Best College award by' University of Mumbai.

**VACANCY FOR PLACEMENT OFFICER 2024-25**

**Position: Placement Officer- Male**

**Job Role:**

The candidate will be responsible for all activities pertaining to placement of the organization. The job will entail visiting corporates/ companies and coordination with the applicants. Below is the job role.

- Source placement opportunities for candidates from 10th pass till PG.
- Maintain proper database of applicants and their status of follow-up.
- Connect with HR personnel of various companies for placements by visiting their offices.
- Screen candidates and match their profile with the requirements of the company prior to sending them for interviews at companies.
- Co-ordinate with the company and take feedback review of the candidate sent for the interview.
- Handle the entire recruitment cycle of the applicant.

**Role Category :** Recruitment & Talent Acquisition.
**Education Qualification :** Any Graduate/PG with MBA in HR/marketing
**Key Skills** : **Excellent communication skills, Computer literate, good excel skills and analytical skills.**
**Salary: As per industry standards.**

**Interested candidates must send their updated Resume copy on placementcell@ckthakurcollege.net**
**Last date to apply: 18th January, 2025.**
**Contact for queries : Ms. Aarti Kagwade- 9819694009.**

**Shri. Ramsheth Thakur (Ex.M.P.)**
Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha,Panvel.

# नवी मुंबई विमानतळाला 'दिबां'चेच नाव लागणार -मंत्री गणेश नाईक





**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि. बा. पाटील यांचेच नाव लागणार असल्याचे प्रतिपादन वनमंत्री गणेश नाईक यांनी वाशी येथे केले. नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्थेच्या वतीने दि. बा. पाटील यांच्या ९९व्या जयंती निमित्ताने वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

या वेळी माजी खासदार संजीव नाईक, माजी आमदार संदीप नाईक, माजी महापौर जयवंत सुतार, माजी महापौर सुधारक सोनवणे, माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत माजी नगरसेविका वैजयंती भगत, निशांत भगत यांच्या सह अन्य मान्यवर उपस्थित होते.

या वेळी गणेश नाईक पुढे म्हणाले की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला 'दिबां'चे नाव लागणार हा मला विश्वास आहे. कारण नामकरण चळवळ ही सर्वांनीच जिद्दीने मनावर घेतली आहे, लवकरच याबाबतीत राज्य आणि केंद्र स्तरावर शासकीय सोपस्कार पार पडून येत्या काही महिन्यांतच जनभावनेचा आदर करून निर्णय होईल.

या वेळी नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष आणि माजी विरोधी पक्ष नेते दशरथ भगत म्हणाले की, दि. बा. पाटील यांनी संघर्ष करून पीडीताना न्याय मिळवून दिला. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेत पीडित घटकांच्या न्यायासाठी चळवळ निर्माण करणे आवश्यक आहे. दि. बा. पाटील यांच्या नेतृत्वाखालील संघर्षातून साडेबारा टक्के योजना लागू झाली. त्यांच्या प्रति कृतज्ञता म्हणून नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळास दि. बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे.

या वेळी दि. बा. पाटील यांच्या संघर्षमय, प्रेरणादायी जीवनाचे चित्रप्रदर्शन, रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, ज्येष्ठ नागरिक, कचरावेचक भगिनी, कर्तव्यदक्ष महिला रिक्षा चालक भगिनी व अन्य उल्लेखनीय सामाजिक योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान, पाणपोई लोकार्पण असे विविध सामाजिक उपक्रम घेण्यात आले.

# करावे गावातील शाळेची दुरवस्था
## भयानक अवस्थेत शिकताहेत विद्यार्थी

**नवी मुंबई : बातमीदार**

करावे गावातील नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्रं ०६ या शाळेतील वर्गांची दुरवस्था झाली असून, सिमेंट निघालेल्या वर्गात विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. अशा अवस्थेत विद्यार्थी शिक्षण घेत असल्याने ओलसर झालेली भिंतीचा कुबट वास येत आहे. तशाच अवस्थेत विद्यार्थी शिक्षण घेत असल्याने त्यांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे.

विविध उपक्रम राबविण्यासाठी प्रसिद्ध असलेली पालिका सध्या सीबीएसई बोर्ड सुरू करण्यासाठी, आधुनिक शिक्षण विद्यार्थ्यांना मिळावे यासाठी प्रयत्न करत आहे, मात्र हे करताना स्वतःच्या शाळांकडे पालिका दुर्लक्ष करत आहे की काय? असा प्रश्न करावे गावातील शाळा पाहिल्यावर पडतो. या शाळेतील वर्गात प्लॅस्टर निघालेले आहे. त्यामुळे अनेकदा सिमेंटचे दगड वर्गात पडलेले दिसून येतात. भिंतीवरील प्लॅस्टर निघून सिमेंट निघालेले आहे. त्यामुळे अनेकदा वर्गात विद्यार्थ्यांनी बनवलेली चित्रे,



विविध सामाजिक शैक्षणिक संदेश, लावले जातात मात्र इथे भिंतीच खराब झाल्याने असे संदेश लावणे अशक्य झाले आहे. मुख्य म्हणजे या भिंतीमध्ये ओल जाऊन त्यांचे सिमेंट निघत असून, त्यासोबत कुबट दुर्गंधी पसरलेली आहे. तसेच बुरशी तयार झाली आहे. ही बुरशी व सिमेंटची धूळ वर्गात उडत असून विद्यार्थ्यांच्या नका तोंडात जात असल्याने विद्यार्थ्यांना सर्दी खोकला होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

ही समस्या तातडीने सोडवावी अशी मागणी दुर्गा फाऊंडेशनने आ. मंदा म्हात्रे यांच्याकडे केली आहे.

**महानगरपालिकेतील शाळेत शिक्षण घेण्यास विद्यार्थ्यांना आवड निर्माण होऊन शाळेची पटसंख्या वाढू शकते. याबाबत आमदार मंदा म्हात्रे यांना दुरुस्ती करण्याबाबत विनंती पत्र दिले आहे. आमदार मंदा म्हात्रे विकास्त्मक कामे करत असून, शाळेची दुरुस्ती करून विद्यार्थ्यांना न्याय द्यावा.**
**-शोभा भोईर,**
**संस्थापिका अध्यक्षा, दुर्गा फाऊंडेशन, करावे गाव**

# नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडवा
## वनमंत्री गणेश नाईक यांना निवेदन



**नवी मुंबई : बातमीदार**

सी-वुडङ्स करावे गावातील माजी नगरसेवक विनोद म्हात्रे यांनी वनमंत्री गणेश नाईक यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी मंत्री नाईक यांना पत्र देऊन प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडविण्याची मागणी केली. सिडको क्षेत्रातील ९५ गावातील मुळ स्थानिक प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नाविषयी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि संबंधित अधिकार बैठक आयोजित करण्याची विनंती माजी नगरसेवक म्हात्रे यांनी केली आहे.

नवी मुंबईतील गजरेपोटी बांधलेल्या घरांना नियमित करणे, तहहयात प्रकल्पग्रस्त दाखला मिळणे, घोषित १२.५० टक्के विकसित भूखंड देण्यात ऐवजी प्रत्यक्षात ८.७५ टक्के भुखंड मिळणे, उर्वरित ३.७५ टक्के भुखंड वाटप करणे अशा महत्त्वाच्या मागण्या करण्यात आल्या आहेत.

शेवटचा शासन निर्णय विधानसभेच्या निवडणुकीची आचारसंहीता लागण्यापुर्वी आला त्यास उच्च न्यायालयात आव्हान दिले असल्याचे विनोद म्हात्रे यांनी पत्रात म्हटले आहे.

# युईएस स्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये स्नेहसंमेलन

**उरण : वार्ताहर**

युईएस स्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स ॲण्ड कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड टेक्नॉलॉजीमध्ये शुक्रवार (दि.१०) वार्षिक स्नेहसंमेलन भव्यदिव्यपणे साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिध्द साहित्यिक व वक्ते, सन्माननिय डॉ. संजय कळमकर उपस्थित होते. त्यांचा सत्कार युईएस संस्थेचे अध्यक्ष आर्किटेक्ट तनसुख जैन यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच अध्यक्ष आर्किटेक्ट तनसुख जैन, उपाध्यक्ष मिलिंद पाडगांवकर, मानद सचिव आनंद भिंगार्डे, सहसचिव ॲड. अपूर्वा ठाकूर, ज्येष्ठ सदस्य आणि खजिनदार चंद्रकांत ठक्कर, सदस्य ड्व्होकेट राजेंद्र भानुशाली यांचाही सन्मान



सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या, स्कूल व ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या, सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख तसेच माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका ह्यांचा हस्ते पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला.

व्यासपीठावर प्राथमिक, पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका व समन्वयक उपस्थित होते. ज्येष्ठ पत्रकार संजय जोग यांचाही पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. प्राचार्या सिमरन दहिया आणि सिनियर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या डॉ. मिनाक्षी गुप्ता यांनीही पीपीटीद्वारे वार्षिक अहवाल सादर केला.

यानंतर युईएस संस्थेचे मानद सचिव आनंद भिंगार्डे व अध्यक्ष आर्किटेक्ट तनसुख जैन यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सन्माननिय डॉ. संजय कळमकर यांनी आपल्या भाषणातून साहित्याचा समाज मनावर होणारा परिणाम इत्यादी अनेक विषयांवर मौलीक असे भाष्य केले.

# विज्ञान प्रदर्शनात 'विद्याभवन'ची बाजी

**नवी मुंबई : बातमीदार**

श्रीराम राधाकृष्णन मेमोरियल ट्रस्ट आणि रोटरी क्लब ऑफ न्यू बॉम्बे सीसाईड यांच्यामार्फत आयोजित करण्यात आलेल्या खोज ६ या विज्ञान प्रदर्शनात पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलाच्या प्राथमिक मराठी विभागाला प्रथम क्रमांकाचे १० हजार रुपयांचे पारितोषिक प्राप्त झाले. विद्याभवनच्या इंग्रजी विभागाला द्वितीय क्रमांकाचे सहा हजार



रुपयांचे पारितोषिक मिळाले.

विभूती दत्तात्रय गुंजाळ आणि वेदश्री विश्वनाथ राक्षे या विद्यार्थिनींनी मानसिक आरोग्य या विषयावर प्रकल्प सादर केला. या प्रकल्पात विज्ञान शिक्षिका राधिका भोसले यांनी मार्गदर्शन केले. इंग्रजी विभागातून आर्या नात्ती आणि सुहानी कांबळे यांनी सिनियर गटातून मॉडर्न प्रकृती या विषयावर प्रकल्प मांडला. या प्रकल्पाला संदीप गुप्ता यांनी मार्गदर्शन केले.

संस्थेचे कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे, कुलसचिव दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका सुवर्णा मिसाळ, श्रीजा नायर, मुख्याध्यापक गोरख कदम व समन्वयक पांडुरंग मुळीक यांनी अभिनंदन केले.

# फुंडे हायस्कूलमध्ये वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा

**उरण : रामप्रहर वृत्त**

फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात शनिवारी (दि.११) वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा झाला. शैक्षणिक वर्षभरात विविध उपक्रम, स्पर्धा, परीक्षा घेतल्या जातात.

गुणवंत विद्यार्थ्यांच्या कौतुकाचा सोहळा साजरा करण्यात येतो चालू वर्षीदेखील हा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा तितक्याच उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यालयाचे प्राचार्य एम.जी. म्हात्रे, स्थानिक स्कूल कमिटी



चेअरमन कृष्णाजी कडू, उपमुख्याध्यापक भरणूके डी.डी., जुनियर कॉलेज विभाग प्रमुख व्ही. के. कुटे, गुरुकुल प्रमुख प्रशांत पाटील, ज्येष्ठ शिक्षिका साधना पाटील, आर जी शेळके, एस. डी. म्हात्रे सर, सर्व शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत सोहळा झाला.

आदर्श विद्यार्थी म्हणून वैभव गुट्टे तर आदर्श विद्यार्थिनी म्हणून श्रावणी कोळी या दोन विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. बक्षिस वितरण समिती प्रमुख जयश्री देवरे, सहायक सुतार दीप्ती, सीमा माळी, सांस्कृतिक विभाग प्रमुख एच. एन. पाटील, कलाशिक्षक रमेश खुटारकर, क्रीडा प्रमुख दिगंबर पाटील यांनी या सोहळ्याचे नियोजन केले होते.

# नेरूळमध्ये रंगला अखंड हरिनाम सोहळा

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

शेजारच्या गावात अखंड हरिनाम सप्ताह भरविला जातो, मग माझ्या गावातच का नाही? हीच खूण गाठ मनाशी बांधून अक्षय गजानन पाटील या तरुणाने नेरूळ गावात सुरू केलेली भागवत भक्तीची ज्योत अखंडपणे तेवत ठेवण्यासाठी अशा तरुणांना सर्वतोपरी सहकार्य करण्याची गरज असल्याचे मत ज्येष्ठ कीर्तनकार, रामायणाचार्य ह.भ.प. डॉ. जलाल महाराज सय्यद यांनी नेरूळ येथे केले.

कोकणातील श्रोते हे सतत हसतमुख असतात, प्रसन्न असतात त्यामुळे येथे



कीर्तन करताना आम्हीही अधिक खुळून जातो व कीर्तन सेवेलाही चांगला रंग चढतो, असेही शेवटी डॉ.सय्यद महाराज आपल्या कीर्तन सेवेत श्रोत्यांशी हितगुज करताना म्हणाले.

सामाजिक कार्यकर्ते अक्षय गजानन पाटील यांच्या विद्यमाने सगुणाआई वामन पाटील यांच्या स्मरणार्थ गावदेवी मंदिर, नेरूळगाव येथे तीन दिवसीय अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी काल्याच्या कीर्तनाची सेवा करताना ते बोलत होते. या अखंड हरिनाम सोहळ्यात ह.भ.प. आदिनाथ महाराज लाड देवाची आळंदी, ह.भ.प. संजय महाराज पाटील वारदोली, ज्ञानाई हरिपाठ मंडळ, गावदेवी प्रासादिक भजन मंडळ, शंकर प्रासादिक भजन मंडळ नेरूळगाव आदींची कीर्तन, हरिपाठ व भजनसेवा झाली. या वेळी सुमारे १२०० भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

नेरूळ गावाला फार मोठा सांस्कृतिक वारसा आहे. या गावातून अनेक भजन कलावंत पुढे आले असून या गावाने अनेक संगीत नाटकं रंगभूमीला दिलेली आहेत. पूर्वी तमाशाचे फडही येथे रंगलेले आहेत, मात्र अखंड हरिनाम सप्ताहाची परंपरा येथे फारसी पहावयास मिळत नव्हती. यात कुठे तरी बदल व्हावा याच जाणिवेतून हा अखंड हरिनाम सप्ताह सुरू झालेला आहे.

यात समस्त पाटील कुटुंबीय, ग्रामदेवता मंदिर ट्रस्ट, विश्वधर्म वारकरी सामाजिक संस्था, ह.भ.प. एकनाथ महाराज यांची दिंडी क्रमांक ६० आणि नेरूळ ग्रामस्थांचे फार मोठे योगदान आहे. यात मी कुठेच नसून मी निमित्त मात्र आहे, असे या उपक्रमाविषयी माहिती देताना सामाजिक कार्यकर्ते अक्षय गजानन पाटील यांनी सांगितले.

# बार्न्स कॉलेजमध्ये वाचन संकल्प महाराष्ट्राचा पंधरवडा उपक्रम सुरू



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथील बार्न्स कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स आणि कॉमर्स महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा पंधरवडा या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमाचे उद्‌घाटन डॉ. शिवदास कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. या उद्‌घाटनावेळी प्राचार्य प्रा. कल्पेश भोईर यांनी वाचनाचे महत्त्व आणि वाचन संस्कृती विकसित करण्याची गरज याविषयी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास कला विभाग प्रमुख आणि आजीवन अध्ययन व विस्तार विभाग प्रमुख प्रा. प्रशांत पाटील ग्रंथालय प्रमुख ज्योती म्हात्रे, सहकारी प्राध्यापीका तसेच महाविद्यालयातील अनेक विद्यार्थीही या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने सहभागी झाले.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे आणि ज्ञानाच्या क्षितिजाचा विस्तार करण्याचा उद्देश साध्य करण्यात आला. उपस्थित विद्यार्थ्यांनी या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद दिला.

क्लिक...क्लिक...!



**अलिबाग : मकरसंक्रांतीनिमित्ताने वरसोली समुद्रकिनारी बच्चेकंपनी पतंग उडविण्याचा आनंद घेत असतानाचे छायाचित्र टिपले आहे जितू शिगवण यांनी.**

# बुक्स इन बस उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिका परिवहन उपक्रमाच्या व्होल्वो वातानुकूलित बसेसमध्ये 'बुक्स इन बस' (बसमधील चालते फिरते ग्रंथालय) हा आगळावेगळा उपक्रम जानेवारी २०२२ पासून सुरू करण्यात आला असून त्याला अगदी सुरुवातीपासूनच नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला आहे.

लांब अंतराच्या प्रवासात प्रवाशांना उत्तम पुस्तके वाचता यावीत व या माध्यमातून त्यांच्या माहिती व ज्ञानात भर पडावी या संकल्पनेतून लेट्स रीड फाउंडेशन या संस्थेच्या सहयोगाने सुरू करण्यात आलेला हा उपक्रम अल्पावधीतच प्रवाशांच्या पसंतीस उतरला होता.

तथापि या बसेसमधील लघु ग्रंथालयात ठेवण्यात आलेली पुस्तके वारंवार हाताळली गेल्याने जीर्ण झाली असल्याबाबत प्रवाशांकडून वारंवार सूचना प्राप्त होत होत्या. त्याचप्रमाणे सुरुवातीला पुस्तके ठेवल्यानंतर दरम्यानच्या प्रसिध्द झालेली लोकप्रिय पुस्तकांचा समावेश बसेसमधील लघु ग्रंथालयात असावा अशीही मागणी रसिक वाचकांकडून करण्यात येत होती. त्या अनुषंगाने सदर लघु ग्रंथालयातील पुस्तके बदलून



त्याठिकाणी नवी कोरी वाचनीय मराठी व इंग्रजी भाषेतील पुस्तके ठेवण्यात आली असून या लघु ग्रंथालयाचे नुतनीकरण करण्यात आलेले आहे.

सद्यस्थितीत 'बुक्स इन बस' (बसमधील चालते फिरते ग्रंथालय) हा अभिनव उपक्रम बस मार्ग क्र.४२ वाशी रेल्वे स्टेशन ते डोंबिवली, तसेच बस मार्ग क्र.५६ मानसरोवर रेल्वे स्टेशन ते कळंबोली पोलीस मुख्यालय, आणि बस मार्ग क्र.६२ वाशी रेल्वे स्टेशन ते कल्याण व बस मार्ग क्र.७३ पनवेल रे.स्थानक ते कल्याण या मार्गांवरील काही बसेसमध्ये कार्यान्वित आहे.

या बसेस मधील लघु ग्रंथालयात आत्मचरित्रे, मनोरंजन कथा, कविता व कथा संग्रह, ऐतिहासिक साहित्य अशा विविध नामवंत लेखकांच्या मराठी तसेच इंग्रजी भाषेतील पुस्तकांचा समावेश आहे. या लघु ग्रंथालयाचे नुतनीकरण करून नवीन वाचकप्रिय पुस्तके उपलब्ध केल्याबद्दल प्रवाश्यांनी आनंद व्यक्त केला.

## निवडक

### हरवंडी कोंड येथील तरुणी बेपत्ता

**माणगाव :** तालुक्यातील हरवंडी कोंड येथील २२ वर्षीय



तरुणी आपल्या राहते घरातून द.ग.तटकरे विद्यालय येथे कामाला जाते असे सांगून ती बेपत्ता झाली आहे. माणगाव पोलीस मुलीचा शोध घेत आहेत. बेपत्ता तरुणीचे नाच नवनिता भारत कदम (वय २२, रा. हरवंडी कोंड,ता.माणगाव) असून ती हि द.ग.तटकरे विद्यालय येथे कामाला जाते असे सांगून ती आपल्या घरातून बाहेर पडून निघून गेली ती अद्यापपर्यंत घरी परत न आल्याची फिर्याद माणगाव पोलीस ठाण्यात देण्यात आली. नवनिता कदमचा चेहरा गोल, उंची पाच फूट दोन इंच, रंग सावळा, केस काळे व लांब, अंगाने सडपातळ, अंगात आकाशी टॉप व लेगीज, पायात सँडल असे आहे. ही तरुणी कोणाला आढळल्यास तापसिक अंमलदार तुणतुणे (७४९८३२४१९०) यांच्याकडे संपर्क साधण्याचे आवाहन माणगाव पोलीस ठाण्यातर्फे करण्यात आले आहे.

### बारपे गावामध्ये मेळावा



**माणगाव :** दक्षिण रायगड जिल्ह्यातील आदिवासी महादेव कोळी/डोंगर कोळी समाजाचा मेळावा बारपे येथे आयोजित करण्यात आला होता. रायगड जिल्हा अध्यक्ष महादेव दिवेकर यांचे अध्यक्षतेखाली झाला. बारपेगाव समाजाचे अध्यक्ष विठोबा हरी साबळे यांच्या नेतृत्वाखाली या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यास तळा, माणगाव, महाड, पोलादपूर, रोहा, अलिबाग, सुधागड, पाली या तालुक्यातून समाज बांधव उपस्थित होते.

### माणगाव येथे रक्तदान शिबिर



**माणगाव :** उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे व प्राथमिक आरोग्य केंद्र गोरेगाव येथे जगद्गुरु श्री नरेंद्रचार्यजी महाराज सांप्रदाय माणगाव यांच्या माध्यमातून रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. ओम ब्लड सेंटर पुणे यांचे मार्फत ८५ रक्तकुपिकांचे संकलनाचे कार्य पुर्ण झाले तर गोरेगाव येथे झालेल्या रक्तदान शिबिरात ७५ रक्तकुपिकांचे संकलन झाले या कार्यासाठी सेवाकेंद्र माणगाव सेवाकेंद्र गोरेगाव, सेवाकेंद्र इंदापुर देवळी, सेवाकेंद्र लोणेरे, सेवाकेंद्र साखळेवाडी आदी सेवाकेंद्रातील पदाधिकारी व भक्तगण यांनी विशेष मेहनत घेतली.

# कुष्ठरुग्ण शोधमोहीम योग्यरित्या राबवा

## जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या सूचना

**अलिबाग : प्रतिनिधी**



जिल्ह्यात कुष्ठरुग्ण शोधमोहीम अभियान ३१ जानेवारी ते १४ फेब्रुवारीदरम्यान राबविण्यात येणार आहे. या मोहिमेदरम्यान आशा स्वयंसेविका, स्वंयसेवक घरोघरी जाऊन सर्वेक्षण करून संशयित कुष्ठरुग्णांचा शोध घेणार असून, रुग्णांवर उपचार करण्यात येणार आहेत. या मोहिमेच्या पूर्वतयारीचा आढावा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि.१४) जिल्हा परिषदेत आयोजित बैठकीत घेण्यात आला. या वेळी मोहिम यशस्वीरित्या राबविण्यासाठी योग्य नियोजन करण्याच्या सूचना डॉ. भरत बास्टेवाड यांनी संबंधितांना दिल्या.

कुष्ठरुग्ण शोध अभियान मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील २३ लाख ५० हजार लोकसंख्येचे सर्वेक्षण गृहभेटी देऊन करण्यात येणार आहे. यासाठी एक हजार ६६२ पथके तयार करण्यात आली आहेत. ३३२ पर्यवेक्षकांच्या माध्यमातून मोहीम राबविण्यात येणार आहे. मोहिमेंतर्गत घरातील सर्व सदस्यांची कुष्ठरोगसंदर्भात संपुर्ण शारिरीक तपासणी करण्यात येणार आहे. या मोहिमेंतर्गत समाजातील निदान न झालेले कुष्ठरुग्ण लवकरात लवकर शोधून त्यांच्यावर औषधोपचार करण्यात येणार आहेत. नवीन कुष्ठरुग्ण शोधून बहुविध औषधोपचाराद्वारे संसर्गाची साखळी खंडित करून होणारा प्रसार कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

मंगळवारी झालेल्या बैठकीला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनिषा विखे, सहायक संचालक कृष्ठरोग डॉ. प्राची नेहुलकर, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शितल जोशी यांच्यासह जिल्हा समन्वय समिती सदस्य उपस्थित होते.

**"कृष्ठरुग्णांचा शोध घेण्यासाठी एक हजार ६६२ पथके स्थापन करण्यात आली आहेत. या पथकांच्या माध्यमातून जिल्ह्यातील घरोघरी सर्वेक्षण करुन कुष्ठरुग्ण शोधमोहीम काटेकोरपणे राबविण्यात येणार आहे. शोधमोहिमेदरम्यान नागरिकांचे कुष्ठरोग आजाराबाबतचे गैरसमज दूर करुन ते बरे होऊ शकतात असा विश्वास त्यांच्या मनात निर्माण करून कृष्ठरुग्णांना तपासणी व उपचारासाठी प्रवृत्त करण्यात येणार आहे.**

**–डॉ. भरत बास्टेवाड**, मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद

### *अशी असेल मोहीम*

**जिल्ह्यात ४७९ सक्रीय कृष्ठरुग्ण डिसेंबरअखेर रायगड जिल्ह्यात ४७९ कृष्ठरुग्णांवर उपचार करण्यात येत आहेत. यामध्ये अलिबाग तालुक्यात २३ कृष्ठरुग्ण असून, कर्जत ७६, खालापूर ४५, महाड ३१, माणगाव ३३, म्हसळा १०, मुरुड ७, पनवेल ग्रामीण ४८, पनवेल शहर ५५, पेण ४४, पोलादपूर ८, रोहा ३८, श्रीवर्धन ८, सुधागड ३२, तळा ५, उरण १६ कृष्ठरुग्ण आहेत.**

## तरुणांना आपत्कालीन व्यवस्थापन प्रशिक्षण

**कर्जत : प्रतिनिधी**

प्रत्येकाला कधीही कोणत्याही आपत्तीला तोंड देण्याची वेळ येऊ शकते. त्यामुळे नेरळ येथील करिअर टेक्निकल इन्स्टिटयूट यांच्या माध्यमातून परिसरातील १०० तरुणांना आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण देण्यात आले. त्याचवेळी आपत्ती काळात मदत व्हावी म्हणून निहारिया फाउंडेशन कडून सेफ्टी किट भेट देण्यात आले.



नेरळ कशेळे राज्यमार्ग रस्त्यावर करिअर टेक्निक इन्स्टियुट असून या इन्स्टिटयूटचे माध्यमातून विद्यार्थ्यांना तंत्र प्रशिक्षण दिले जाते. सध्या निहारिका फाउंडेशन कडून करिअर टेक्निकल ट्रेनिंग इन्स्टिटयूट संस्था चालविली जात आहे. या संस्थेच्या माध्यमातून कर्जत तालुक्यातील तरुणांना आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या १०० तरुणांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आली. त्यावेळी कर्जत पंचायत समितीचे माजी सभापती अमर मिसाळ, जिल्हा परिषदेने आदर्श शिक्षक म्हणून गौव केलेले शिक्षण संतोष कांबरी, संस्थेचे प्राचार्य गणेश भोपी तसेच अविनाश डायरे, आतिष आगिवले, रंजना भोपी, गणेश भोपी आदी उपस्थित होते.

आपत्कालीन व्यवस्थापन ट्रेनिंग पूर्ण करणाऱ्या १०० तरुणांना प्रमाणपत्र आणि सेफ्टी किट यांचे वाटप करण्यात आले. भारत सरकारच्या स्किल इंडिया योजनेंतर्गत नेरळ आपत्कालीन व्यवस्थापन या प्रशिक्षण देण्यात आले. या वेळी तरुणांना अंबरनाथ येथील शासकीय कौशल्य विकास केंद्रातील अध्यापक अविनाश भोपी यांनी मार्गदर्शन केले तर त्या सर्व १०० तरुणांना अविनाश डायरे तसेच आतिष आगिवले यांनी प्रशिक्षण दिले.

## बोरघाट पोलीस केंद्रातर्फे आरोग्य शिबिर

**खोपोली : प्रतिनिधी**

महामार्ग सुरक्षा पथक रायगड परिक्षेत्र अंतर्गत महामार्ग पोलीस केंद्र बोरघाट यांच्या वतीने डॉ. सुरेश कुमार मेकला, अप्पर पोलीस महासंचालक (वाहतूक) यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक सुरक्षा अभियान राबवले जात असून त्यात आरोग्य शिबिराचे आयोजन केले गेले होते. महामार्ग सुरक्षा पथकाचे रायगड परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक तानाजी चिखले यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन झाले.

लायन्स क्लब ऑफ खोपोली, अपोलो हॉस्पिटल आणि समर्पण ब्लड बँकच्या वतीने सोमवारी (दि.१३) डॉ. रामहरी धोटे सभागृहात झालेल्या शिबिरात खोपोली पोलीस स्टेशनचे कर्माचारी आणि अधिकारी, मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावरील वाहतूक पोलीस अधिकारी आणि कर्मचारी, हेल्प फाउंडेशनचे सदस्य, महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान, खालापूर टोल नाक्यावरील कर्मचारी, खोपोली रिक्षा चालक–मालक संघटनेचे सदस्य त्याच सोबत अनेक वाहन चालक मालकांसमवेत नागरिकांनी उस्पूर्त सहभाग घेतला होता. अपोलो हॉस्पिटल संचलित नव्याने दाखल झालेल्या फाईव्ह जी कार्डियाक ॲम्बुलन्सची विस्तृत माहितीही देण्यात आली.

या शिबिरासाठी पोलीस अधीक्षक अरविंद साळवे, उपाधीक्षक जोत्स्ना रासम, पोलीस निरीक्षक पनवेल विभाग भरत शेंडगे, खोपोली पोलीस स्टेशनचे निरीक्षक शितल राऊत, महामार्ग वाहतूक पोलीस केंद्राचे प्रभारी अधिकारी अनिल शिंदे, लायन्स क्लब ऑफ खोपोलीचे पदाधिकारी, हेल्प फाउंडेशनचे गुरुनाथ साठेलकर यांचा मोलाचा सहभाग होता.



## महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाची पेण आणि रोहा तालुका कार्यकारिणी जाहीर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**



समाजातील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी आणि पत्रकार बांधवांचे हित जोपासण्यासाठी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या विद्यमाने रायगड जिल्ह्यात कोकण कार्याध्यक्ष तथा ज्यष्ठ पत्रकार शैलेश पालकर आणि जिल्हाध्यक्ष राकेश खराडे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाची कार्यकारणी जाहीर करण्यात आली.

या वेळी पेण येथील पत्रकारांनी कोकण कार्याध्यक्ष शैलेश पालकर व जिल्हाध्यक्ष राकेश खराडे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघात सामील होवून पेण येथील शासकीय विश्रामगृहात बैठकीवेळी जाहीर करत पेण व रोहा तालुका कार्यकारीणी पदाधिकारी नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

या वेळी कोकण कार्याध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर, रायगड जिल्हाध्यक्ष राकेश खराडे यांनी सर्व पत्रकारांना सोबत घेऊन समाजात वाढत असलेल्या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम तसेच पत्रकार बांधवांचे हीच जोपासण्याचे काम महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या माध्यमातून करायचे असल्याचे सांगितले. पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असल्याने पत्रकाराला सोयी सुविधा, अधीस्वीकृती धारक पत्रकार करण्याचे ध्येय असल्याचे सांगितले.

या वेळी पेण तालुका महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ कार्यकारणी पेण तालुकाध्यक्ष राजेश कांबळे, उप तालुकाध्यक्ष विनायक पाटील, सचिव स्वप्निल पाटील, सहसचिव सुदर्शन शेळके, खजिनदार किरण बांधणकर, सल्लागार दिपक लोके, सह सल्लागार गणेश पाटील, सदस्य रूपेश गोडिवले, मितेश जाधव, प्रशांत पोतदार अशी पदाधिकाऱ्यांची कार्यकारणी जाहिर करण्यात आली. तर रोहा तालुका अध्यक्षपदी किरण मोरे, उपाध्ययक्षपदी संदेश गायकर, खजिनदार दिनेश मोरे, सचिव सुरेश पंधेरे, सल्लागार समीर बामुगडे, सदस्य म्हणून विश्वनाथ कोलते, अनंता म्हस्कर, संजय गायकवाड, काशिनाथ बामुगडे यांची निवड करण्यात आली.

या वेळी पेण कार्यकारणी व रोहा कार्यकारिणी पदाधिकाऱ्यांना कोकण कार्याध्यक्ष शैलेश पालकर व जिल्हाध्यक्ष राकेश खराडे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देवून पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या. या वेळी पेण तालुका व रोहा तालुक्यातील पत्रकार बांधव उपस्थित होते.

## माणगाव टिएमसी कॉलेजमध्ये राष्ट्रीय युवा दिन उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

जे.बी सावंत एजुकेशन सोसायटीच्या टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजमध्ये राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय युवा दिन उत्साहात साजरा झाला.

राष्ट्रीय युवा दिनानिमित्त राष्ट्र निर्माणात युवकांचे योगदान या विषयावर प्रभारी प्राचार्य हर्षल जोशी यांनी, युवकांचे प्रेरणास्थान म्हणून स्वामी विवेकानंद यांच्याकडे पाहिले जाते. सन १९८५पासून स्वामींच्या जन्म दिनानिमित्त १२ जानेवारी हा दिवस युवा दिन म्हणून साजरा करावा असे सरकारने सूचित केले असल्याचे सांगत शिकागो परिषदेतील स्वामींचे भाषण संपूर्ण जगाला प्रेरणा देऊन गेल्याचे सांगितले. प्रा.डॉ. जगदीश शिगवण यांनी राष्ट्रमाता जिजाऊ यांच्याबद्दल सविस्तर माहिती दिली.

प्रारंभी विवेकानंद व जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. या कार्यक्रमास उपजिल्हा रुग्णालयाच्या संचिता खेडेकर व रजपूत यांचे सहकार्य लाभले. ग्रंथपाल अमित बाकाडे, डॉ. जगदीश शिगवण, डॉ. नितीन मुटकुळे, प्रा. भारत पवार, प्रा.सायगांवकर, प्रा. मांडवकर व कर्मचारी उपस्थित होते.




## मेहंदळे शाळेत शुद्ध पाण्यासाठी फिल्टर




**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील मधुकर सिताराम गांगल प्राथमिक शाळेत धाटाव औद्योगिक क्षेत्रातील सामाजिक बांधिलकीत अग्रेसर असणारा प्रख्यात डियमसीसी या कारखाने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) उपक्रमांचा भाग म्हणून उत्तम दर्जाचे वॉटर कुलर देण्यात आले.

कंपनीचे कुलदीप तिवारी (executive director) व प्लांट हेंड किरण हिंगणे यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्यपूर्ण तालुक्यातील किल्ला, लांढर, तळाघर, वरसे, रोठ बुद्रुक, रोठ खुर्द अशा विविध ठिकाणी विद्यार्थ्यांना कंपनी मदत करण्याचे काम करित आहेत. दरम्यान, कंपनीचे यच.आर. मॅनेजर अनिल जांभळे यांनी या वेळी बोलताना सांगितले की, अनेक महिलांच्या हाताला काम धंदा देऊन लघुउद्योगाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करून कंपनी देत आहे.

या वेळी प्लांट हेंड किरण हिंगणे, अनिल जांभळे, राकेश खांडेकर, केतन पवार, अनिकेत पाटील, निलेश शेंडगे यासह शाळेचे शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## राज्यस्तरीय आविष्कार सोहळा दिमाखात

**माणगाव : प्रतिनिधी**

अविष्कार २०२५चा शुभारंभ सोहळा डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठात लोणारे येथे दिमाखात साजरा झाला. आविष्कार संशोधनावर आधारित राज्यस्तरीय स्पर्धा असून याचे आयोजन दरवर्षी होते.

राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांनी नियुक्ती केलेल्या समितीच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेचे आयोजन होत आहे. या वर्षी हे आयोजन करण्याचा बहुमान डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे यांना लाभला आहे. २६ विद्यापीठातील एकूण ३० लाख विद्यार्थ्यांपैकी ७७७ नवकल्पक विद्यार्थ्यांनी सहा वेगवेगळ्या श्रेणीमध्ये भाग घेतला आहे. पुढील तीन दिवस



ही स्पर्धा १३ ते १५ जानेवारीपर्यंत चालू राहणार आहे. युनिव्हर्सिटी ग्रँड कमिशनचे सचिव डॉ. मनीष जोशी हे या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून लाभले तसेच डिक्की, पुणेचे अध्यक्ष डॉ. मिलिंद कांबळे. व दीनदयाळ संशोधन केंद्राचे संचालक प्राध्यापक उपेंद्र कुलकर्णी, यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

## ओंकार विद्यामंदिराचे वार्षिक स्नेहसंमेलन साजरे

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड–जंजिरा हिंदू एज्युकेशन सोसायटी व विश्व हिंदू परिषद संचलित ओंकार बालवाडी व ओंकार विद्या मंदीर व सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटी, नासिक संचलित ओंकार कनिष्ठ महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन नुकतेच झाले.

विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन करतांना अध्यक्षीय भाषणात डॉ. मंगेश पाटील यांनी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील महत्वाच्या टप्प्यावर भरपूर वाचन करून



व्यक्तितत्व विकसित करावे, असे आवाहन त्यांनी केले.

या वेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. मंगेश पाटील, प्रमुख अतिथी उद्योजिका, राई सागर बाईत, हिंदु एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष दिलीप जोशी, कोषाध्यक्ष मनोहर गुरव, सचिव सुनील विरकुड, अशोक दिवेकर, स्वप्निल भायदे, दिलीप दांडेकर, शाळा समिती अध्यक्षा दीपाली जोशी, सदस्य उषा खोत, मृदुला आबदेव, प्रतिक्षा गायकर, कार्याध्यक्षा रोमाली भोईनकर, मुख्याध्यापिका प्रविता गार्डी, ज्योती मसाल आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी प्रास्ताविकात मुख्याध्यापिका प्रविता गार्डी यांनी ३५ वर्षापूर्वी बालवाडी च्या माध्यमातून सुरू केलेल्या या संस्कार क्षम शैक्षणिक संकुलाचे इयत्ता.११ वी विज्ञान शाखेपर्यंत यशस्वी वाटचाल झाली असुन भविष्यात पदवी, पदव्युत्तर शिक्षणाची ज्ञानगंगा या भागातील विद्यार्थ्यांना आधारवड ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

ओंकार बालवाडी व विद्या मंदीरातील सुमारे २००हून अधिक विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शन कार्यक्रमांत पोवाडा, लोकगीते तसेच वेशभूषेतून बहारदार गीते सादर करून रसिकांची वाहवा मिळविली.

# आजपासून राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा

**पुणे : प्रतिनिधी**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय व महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने होणार्‍या २३व्या छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी बारामती शहर सज्ज झाले आहे. १५ ते १९ जानेवारी या कालावधीत बारामतीत कबड्डीचा थरार रंगणार असल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी दिली.

ऑलिम्पिकवीर स्व. खाशाबा जाधव यांचा जन्मदिन व राज्य क्रीडा दिनाचे औचित्य साधून या स्पर्धेचे आयोजन करण्यत आले आहे. स्पर्धेचे उद्घाटन १५ जानेवारीला सायंकाळी ६ वाजता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते व क्रीडा व युवक कल्याणमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली होईल. कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, पर्यावरण व वातावरणीय बदलमंत्री पंकजा मुंडे यांची प्रमुख पाहुणे उपस्थिती राहणार आहे.

स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ १९ जानेवारी रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व क्रीडा व युवक कल्याणमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये होईल. उद्घाटन व पारितोषिक वितरण समारंभ आणि स्पर्धा कालावधीत सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन केले जाणार असून महाराष्ट्रातील प्रादेशिक नृत्ये व संगीत याची मेजवानी क्रीडा रसिकांना मिळणार आहे, तर फटाक्यांची आतषबाजी व नेत्रदीपक लेझर शो स्पर्धेची झळाळी उंचविणार आहेत.

प्रतिष्ठेच्या या स्पर्धेत प्रो कबड्डी स्टार अजित चौहान, शिवम पठारे, प्रणय राणे, आकाश शिंदे, संकेत सावंत, विशाल ताठे, शंकर गदई, सुनील दुबिले, जयेश महाजन, श्रेयस उबरदंड, आम्रपाली गलांडे, सलोनी गजमल, रेखा सावंत, हरजीत संधू, सोनाली शिंगटे,दिव्या गोगावले, समरीन बुरोंडकर, मंदिरा कोमकर, यशिका पुजारी, कोमल देवकर या पुरुष व महिला आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय खेळाडूंचा दर्जेदार व कौशल्यपूर्ण खेळ पाहण्याची सुवर्णसंधी पुणे जिल्ह्यातील कबड्डीरसिकांना प्राप्त होणार आहे.

### अत्याधुनिक मॅटची मैदाने

स्पर्धेसाठी अत्याधुनिक मॅटची मैदाने तयार करण्यात आलेली असून प्रेक्षकांकरिता भव्य बैठक गॅलरी उभारण्यात आलेली आहे. ही स्पर्धा साखळी व बाद फेरी पद्धतीने खेळविली जाणार असून सायंकाळी ४ ते ८ वाजेपर्यंत रेल्वे मैदानावार प्रकाशझोतात सामने होणार आहेत. २०१२पासून कोल्हापूर, पुणे, सिंधुदुर्ग, नागपूर, अहमदनगर (अहिल्यानगर) व ठाणे या जिल्ह्यामध्ये या स्पर्धेचे आयोजन झालेले आहे. बारामती शहराला दुसर्‍यांदा या क्रीडा स्पर्धा आयोजनांचा बहुमान प्राप्त झालेला आहे यापूर्वी सन २००९-१०मध्ये या स्पर्धेचे दिमाखदार आयोजन बारामती शहराने केलेले होते.

## राज्य पॉवरलिफ्टिंग क्लासिक स्पर्धा सोलापूरला

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

१७ ते १९ जानेवारी या कालावधीत राज्य क्लासिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धा सब-ज्युनिअर, ज्युनिअर, सीनिअर, मास्टर्स पुरुष व महिला गटात होणार आहे, असे राज्य असोसिएशनचे सरचिटणीस संजय सरदेसाई यांनी कळविले आहे. स्पर्धा मोहोळ (सोलापूर) येथे होईल.

सोलापूर जिल्हा पॉवरलिफ्टिंग असोसिएशन आणि महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धेचे आयोजक विलास बेलदार-संचालक तालीम फिटनेस हे आहेत.

स्पर्धा सोलापूर ग्रामीण भागात प्रथमच होत आहे. राज्य संघटनेने सर्व संलग्न असलेल्या जिल्हा असोसिएशनला परिपत्रक पाठविले आहे. खेळाडू, पदाधिकारी आणि पंच यांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे, असे सरदेसाई यांनी म्हटले आहे.



## महाराष्ट्र केक्स क्रिकेट संघ केटीएम प्रीमियर लीगचा मानकरी

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील मधलापाडा, तेलीपाडा, कुंभारपाडा ग्रामस्थ मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या केटीएम प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद महाराष्ट्र केक्स संघाने पटकाविले. शिवसमर्थ ब्रिगेडियर संघ उपविजेता ठरला.

स्पर्धेत आठ संघांनी सहभाग नोंदविला होता. मालिकावीर व उत्कृष्ट फलंदाज स्वप्नील म्हात्रे, उत्कृष्ट गोलंदाज रोशन (सोन्या) पाटील, उत्कृष्ट कर्णधार ऋषी नारंगीकर, तर एस.पी. इंटरप्राईजेस संघाची शिस्तबद्ध संघ म्हणून निवड करण्यात आली.

विजेत्या संघांना रोख रक्कम व आकर्षक चषक मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. त्याचप्रमाणे वैयक्तिक उल्लेखनीय कामगिरी बजावणार्‍या खेळाडूंनाही पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेचे सूत्रसंचालन सुनील वर्तक व राजेंद्र भगत यांनी केले.

## राष्ट्रीय एल्बो बॉक्सिंग स्पर्धेत रायगडच्या खेळाडूंची चमक



**पेण : प्रतिनिधी**

गुजरातमधील गांधीनगर येथे एल्बो बॉक्सिंग स्पोर्ट फेडरेशन इंडियाच्या विद्यमाने गुजरात एल्बो बॉक्सिंग स्पोर्ट्स असोसिएशनच्या यजमानपदाखाली चौथी राष्ट्रीय एल्बो बॉक्सिंग स्पर्धा झाली. या स्पर्धेत रायगडच्या खेळाडूंनी महाराष्ट्राच्या संघातून खेळून चार सुवर्ण आणि चार रौप्यपदक पटकावित चमकदार कामगिरी केली आहे.

यशस्वी झालेलय खेळाडूंमध्ये रूद्रेश प्रथमेश पाटील, मोहीत परशुराम कोठेकर, गौरव गोरखनाथ म्हात्रे आणि आर्यन निलेश म्हात्रे यांनी प्रत्येकी एक सुवर्ण व रौप्यपदक जिंकले. हे सर्व खेळाडू रवींद्र म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेत सहभागी झाले होते.

या यशाबद्दल त्यांचे एल्बो बॉक्सिंग स्पोर्ट फेडरेशन इंडियाचे चेअरमन व युनायटेडचे अध्यक्ष डॉ. मंदार पनवेलकर यांनी पदक विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी एल्बो बॉक्सिंग स्पोर्ट्स फेडरेशन इंडियाचे अध्यक्ष सुरेश कोळी, उपाध्यक्ष रवींद्र म्हात्रे तसेच गुजरात एल्बो बॉक्सिंग स्पोर्ट्स असोशिएशनचे अध्यक्ष सुरेश परमार, टेक्निकल डायरेक्टर संदीप माने, महाराष्ट्र एल्बो बॉक्सिंगचे सहउपाध्यक्ष अविनाश यांनी मोलाची कामगिरी केली.

## गव्हाण विद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सव

### चेअरमन अरुणशेठ भगत यांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलित

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण कोपर येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये वार्षिक शालेय क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन आणि रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलित करून झाले.

या वेळी मान्यवरांना इयत्ता आठवी क वर्गाने शिक्षिका वृषाली म्हात्रे यांच्या नियोजनात मकर संक्रांतीनिमित्त तयार केलेले शुभेच्छा संदेश देणारे भेटकार्ड आणि पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. त्याचप्रमाणे मान्यवरांना तीळगूळ देण्यात आला.



क्रीडा ज्योत प्रज्वलित झाल्यानंतर विद्यार्थ्यांना क्रीडा शपथ देण्यात आली. पाहुण्यांना मानवंदना देण्यासाठी आरएसपी ट्रूप्सचे सुंदर संचलन झाले.

उद्घाटन सोहळयास विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, ज्येष्ठ नेते जयंत देशमुख, गव्हाण ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच विजय घरत यांच्यासह विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, विद्यालयाच्या शिक्षक पालक संघाचे अध्यक्ष कुंदन मोकल, ज्युनिअर कॉलेजचे विभागप्रमुख बाबुलाल पाटोळे, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, एकनाथ ठाकूर, सागर रंधवे, क्रीडा शिक्षक सुरेश पारखे, गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, ज्येष्ठ शिक्षिका चित्रलेखा पाटील, द्रौपदी वर्तक, योगिता पाटील, चारूशीला ठाकूर, वृषाली म्हात्रे व इतर सर्व शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उद्घाटनपर भाषणात बोलताना अरुणशेठ भगत यांनी विद्यार्थ्यांनी क्रीडावृद्धी करतानाच शिस्त अंगी बाणवावी आणि आपल्या क्रीडा नैपुण्याने आपले विद्यालय तसेच राष्ट्राच्या क्रीडा क्षेत्राची मान उंचवली जाईल असे उत्तमोत्तम खेळाडू आपल्या विद्यालयातून तयार व्हावेत, अशी अपेक्षा व्यक्त करून वार्षिक क्रीडा महोत्सवास शुभेच्छा प्रदान दिल्या.

विद्यार्थिनींच्या दोरी उड्या स्पर्धेचे मान्यवरांच्या उपस्थितीत आणि कॅरम स्पर्धेचे उद्घाटन विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य विश्वनाथ कोळी यांच्या हस्ते झाले. त्यांनी स्वतः विद्यार्थ्यांसोबत कॅरम खेळून या खेळातले नैपुण्य प्रदर्शित केले. त्यांच्यासोबत मुख्याध्यापक गोडसे, संस्थेचे लाईफ मेंबर भोईर आणि विद्यार्थ्यांनी कॅरम खेळण्याचा आनंद लुटला.

प्रास्ताविक व सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे यांनी केले. क्रीडा शिक्षक सुरेश पारखे आणि कलाशिक्षक गणेश भोईर उपस्थित होते.

## क्रिकेट स्पर्धेत श्रीराम सोनखार संघ प्रथम



**रेवदंडा : प्रतिनिधी**

भाजप जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते पुरस्कृत टेनिस बॉल मर्यादित षटकांची क्रिकेट स्पर्धा नुकतीच मुरूड तालुक्यातील मिठेखार येथे झाली. या स्पर्धेचे विजेतेपद श्रीराम सोनखार संघाने पटकाविले.

स्पर्धेचा शुभारंभ व बक्षीस वितरण महेश मोहिते यांच्या हस्ते झाले. मनस्वी मोहिते, भाजप रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग, मुरूड तालुका संघटक जीवन सुतार, सरचिटणीस संदीप चिरायु, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष प्रशांत भोय, सुशील चवरकर, उपसरपंच संदीप ठाकूर, माजी महिला मोर्चा तालुका अध्यक्ष सुचिता घाग, योगेश पाटील आदींची उपस्थिती होती.

क्रिकेट हा अनिश्चिततेचा खेळ असून सांघिक परिश्रम व चिकाटी यामुळे विजय प्राप्त करता येतो, असे सांगून या स्पर्धेचा उद्देश विभागातून दर्जेदार खेळाडू निर्माण व्हावे हा असल्याचे ॲड. मोहिते यांनी सांगितले.

स्पर्धेत द्वितीय क्रमांक साईनाथ शिरगाव व्दितीय संघाने, नूतन चेहेर संघाने तृतीय व चतुर्थ क्रमांक दत्तकृपा सुरई संघाने प्राप्त केला. मालिकावीर नितीन भुरे, सामनावीर करन कटोरे (सोनखार), उत्कृष्ट फलदांज रूपेश माळी (चेहेर), उत्कृष्ट गोलदांज निशांत पनवेलकर (शिरगाव), उत्कृष्ट झेल प्रसन्ना जोशी (साळाव), उदयोन्मुख खेळाडू दक्ष रोटकर (चेहेर) यांची निवड करण्यात आली. स्पर्धेचे सूत्रसंचलन व समालोचन जगदीश चवरकर यांनी केले.

## रसायनीत ॲथलेटिक्स, व्हॉलीबॉल निवड चाचणी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

स्पोर्टस् ॲथॉरिटी ऑफ इंडिया आणि खेलो इंडिया सेंटर यांच्या सौजन्याने रसायनी येथील डॉ. पिल्ले एचओसी इंटरनॅशनल स्कूलच्या मैदानावर १७ व १८ जानेवारी रोजी ॲथलेटिक्स आणि व्हॉलीबॉल या खेळांची निवड चाचणी आयोजित करण्यात आली आहे.

१० ते १७ वयोगटातील ज्या मुला-मुलींना ॲथलेटिक्स आणि व्हॉलीबॉल या खेळामध्ये जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर मिळालेल्या प्रमाणपत्रासह सकाळी ८.३० वाजता एचओसी स्कूलच्या मैदानावर उपस्थित रहावे. सोबत जन्मतारखेचा दाखला, रहिवासी दाखला आणि पासपोर्ट साईज पाच फोटो घेऊन यावा, असे कळविण्यात आले आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांना महात्मा एज्युकेशन संस्थेकडून मोफत शिक्षण व निवासाची व्यवस्था करण्यात येईल, तर मोफत प्रशिक्षण, क्रीडा भत्ता, खेळाचे साहित्य हे स्पोर्टस् ॲथॉरिटी ऑफ इंडियाकडून मिळेल. या संधीचा इच्छुक खेळाडूंनी फायदा घ्यावा तसेच अधिक माहितीसाठी इंझमाम हक्क (८९८७८२९७१), मनोज सीघू (८३६९४५२९५०) यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.




## उद्देश ठाकूर 'रायगड श्री'; हनुमान भगत ठरला बेस्ट पोजर

**धाटाव, रोहे : प्रतिनिधी**

रोहे शहरातील शेख सलाऊद्दीन बाबा दर्गा मैदानावर रोहा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी जिल्हास्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धा झाली. या स्पर्धेत उद्देश ठाकूर याने रायझिंग रायगड श्री २०२५चा किताब पटकवला. बेस्ट पोजर हनुमान भगत ठरला, तर बेस्ट इम्प्रूव्हमेंटचे पारितोषिक सुरदीप सिंगने प्राप्त केले.

मेन फिजिकचा किताब बॉबी पाटील याने प्राप्त केला. द्वितीय क्रमांक रोहन ठाकूर व तृतीय क्रमांक अक्षय कांबळे याने मिळवला. सर्व विजेत्यांना रोख रक्कम व चषक देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

या वेळी मुंबई व रायगड जिल्ह्यातील प्रमुख पाहुणे व प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी महोत्सव कमिटीचे अध्यक्ष अजीज महाडकर, उपाध्यक्ष उस्मान कागदी, सचिव बिलाल मुसा, सहसचिव शोएब फणसे तसेच अमीन सिद्दीकी व इतर सदस्यांनी मेहनत घेतली.

## महाजने बौद्धवाडी प्रीमिअर लीगचा थ्री स्टार वॉरिअर्स संघ विजेता

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील महाजने बौद्धवाडी प्रीमिअर लीग ही मर्यादित षटकांची क्रिकेट स्पर्धा नुकतीच महाजने येथील मैदानात रंगली. या स्पर्धेत थ्री स्टार वॉरिअर्स संघाने प्रथम क्रमांक प्राप्त केला.



महाजने बौद्ध ग्रामस्थ मंडळ, भीमतेज युवा मंडळ व महिला मंडळ यांच्या वतीने महाजने बौद्धवाडी प्रीमिअर लीग आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेत थ्री स्टार वॉरिअर्स, संदीप इलेव्हन, सम्राट इलेव्हन आणि हाशा वॉरिअर्स या संघांनी सहभाग घेतला. यात सम्राट इलेव्हन संघ उपविजेता ठरला.

अमर जाधव याला उत्कृष्ट फलंदाज व सामनावीर, अक्षय जाधवला उत्कृष्ट गोलंदाज आणि मानस जाधवची उत्कृष्ट यष्टीरक्षक म्हणून निवड करण्यात आली. विजेते संघ व खेळाडूंना पदक व चषक देण्यात आले.

स्पर्धेवेळी मॅकेनिकल इंजिनिअर नितेश कांबळे, वृषाली कांबळे, सदानंद दुधाळे, राम जाधव, नंदकुमार जाधव, अनिकेत पवार यांच्यासह संघ मालक शिवाजी जाधव, किसन जाधव, संजय गायकवाड, प्रकाश जाधव, शत्रुघ्न जाधव, खेळाडू, क्रीडाप्रेमी उपस्थित होते.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणार्‍या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणार्‍या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com